रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २१५
www.ramprahar.com

गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते सिडकोच्या घरांची सोडत/२
जेएनपीएचा गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार/३
पनवेलमधील शिवजयंती सोहळा क्षणचित्रे/८

## रेखा गुप्ता दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री; आज शपथविधी



**नवी दिल्ली :** देशाच्या राजधानी कमळ खुलल्यानंतर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा सुरू होती. त्यानुसार बुधवारी भाजपच्या बैठकीत दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. रेखा गुप्ता यांना भाजप आमदारांचा गटनेता म्हणून घोषित करण्यात आले. तसेच दिल्लीच्या भाजप प्रदेशाध्यक्षांनी रेखा गुप्ता ह्याच उद्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील, असेही जाहीर केले. तर परवेश शर्मा हे दिल्लीचे उपमुख्यमंत्री असणार आहेत. दिल्लीसाठी महिला नेतृत्वाला संधी देत भाजपने लाडक्या बहिणींची मनं जिंकली आहेत. रेखा गुप्ता ह्या आरएसएसच्या सक्रीय सभासद असून शालीमार बाग विधानसभेच्या आमदार आहेत. दिल्लीतील रामलीला मैदानावर शपथविधी सोहळा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह दिग्गज नेते तसेच महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित असणार आहेत.

# उलवे नोडमधील शिवसृष्टीतल्या मैदानाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव

## काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवा नोडमध्ये साकारत असलेल्या शिवसृष्टीतील मैदानाला शिवजयंतीच्या पवित्र दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्यात आले आहे. सेक्टर १२ मधील प्लॉट क्रमांक ६ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल जवळील असलेल्या या रामशेठ ठाकूर मैदानाचे उद्घाटन बुधवारी (दि.१९) काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे उपाध्यक्ष माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, रघुनाथशेठ घरत, माजी सरपंच वसंत म्हात्रे, रामदास ठाकूर, माजी सरपंच माई भोईर, वसंत पाटील, विभागीय अध्यक्ष विजय घरत, जयवंत देशमुख, अमर म्हात्रे, विश्वनाथ कोळी, भार्गव ठाकूर, अंकुश ठाकूर, वामन म्हात्रे, रतन भगत, कमलाकर देशमुख, बाबुराव कांबळे, अनिल देशमुख, सुधीर ठाकूर, अशोक कडू, शेखर देशमुख, किरण देशमुख, सरिता कोळी, अश्विनी ठाकूर, हेमलता ठाकूर, इशा देशमुख, शिवानी रॉय, वर्षा देशमुख, मानसी देशमुख, साईचरण म्हात्रे, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना अश्वारूढ पुतळ्याच्या आरक्षित जागेसाठी महेंद्र घरत तसेच इतर सहकाऱ्यांनी चांगले प्रयत्न केलेत, म्हणूनच लवकर शिवरायांचा अश्वारूढ पुतळा आकारास येईल आणि त्या अनुषंगाने गव्हाणजवळ लवकरच शिवसृष्टी उभी राहील असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी सांगितले. या शिवजयंती उत्सवात ओवी देशमुख, स्वरा ठाकूर, त्रियांश मोकल या चिमुकल्यांनी शिवरायांवर केलेल्या भाषणाने आणि उलवा वारियर्स ग्रुपने लाठी-काठी, तलवारबाजीच्या कसरतीने मान्यवरांची मने जिंकले. अंगावर रोमांच उभे राहिले. या वेळी बालकलाकारांनी सादर केलेल्या अभूतपूर्व कलेला प्रोत्साहन म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २० हजार रुपये बक्षीस दिले.

### शिवसृष्टी आणि परिसराच्या नावलौकिकात भर

२०१७-१८पासून या मैदानावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारणी आणि विविध कार्यक्रमे, सभा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांसाठी मैदान व्हावे, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोकडे सतत पाठपुरावा करण्यात आला. (पान २ वर..)

# प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्यासाठी सिडकोला निर्देश द्यावेत

## आमदार प्रशांत ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या शासन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी सिडकोला निर्देश देण्याची आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या संदर्भात निवेदन देण्यात आले असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनात म्हटले आहे की नवी मुंबई प्रकल्पाकरिता ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील एकूण ९५ गावातील जमिनी संपादित करून शासनातर्फे सिडको महामंडळाअंतर्गत या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली, परंतु असे करताना या गावांच्या मुळ गावठाणाच्या हद्दी कायम करून भविष्यातील ग्रामस्थांची नैसर्गिक वाढ लक्षात घेऊन गावठाण विस्तार योजना राबवून नंतरच उर्वरित जमिनीवर प्रकल्पाची उभारणी करणे आवश्यक होते, परंतु तसे न झाल्याने प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी त्यांच्या कुटुंबाच्या नैसर्गिक वाढीपोटी गावठाणालगत रहिवास, उदरनिर्वाहाकरिता बांधकामे केलेली आहेत आणि त्यावर कारवाई न करता ती नियमित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी गेली अनेक वर्ष शासनाकडे पाठपुरावा करून या संदर्भात निर्णय घेण्यास शासनास भाग पाडले.

सर्व प्रथम २०१० साली याबाबत निर्णय झाला (२२ जानेवारी २०१०) परंतु तो समाधानकारक नसल्याने परत अनेक वर्ष पाठपुरावा केल्यानंतर दिनांक २५ फेब्रुवारी २०२२ व दिनांक ०७ डिसेंबर २०२२ रोजी सुधारित शासन निर्णय जाहीर करण्यात आला. परंतु त्यातदेखील काही त्रूटी असल्याने ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी शासनाला सदर बाब लक्षात आणून दिल्यानंतर दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी वांधलेली घरे बांधकामे नियमित करण्याबाबत सुधारित शासन निर्णय जाहीर करण्यात आला. त्या अनुषंगाने अन्य अटींप्रमाणे प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली २५ फेब्रुवारी २०२२ पूर्वीची बांधकामे नियमित करण्याबाबतचा निर्णय झाला. त्यानुसार प्रकल्पग्रस्त व त्यांच्या वारसांनी २५ फेब्रुवारी २०२२ पर्यत केलेली बांधकामाखालील जमीन नियमित करून भाडेपट्टयाने देण्याबाबत निर्णय झाला. परंतु, त्यानंतर याबाबत सिडको प्रशासनातर्फे आजपर्यंत काहीही कार्यवाही झाल्याचे दिसत नाही अजूनही सिडकोतर्फे २५ फेब्रुवारी २०२२ पूर्वीच्या घरांना नोटीस पाठवण्यात येऊन त्यानुसार कारवाई करण्याबाबत सांगितले जाते असल्याचे नमूद करून हि बाब प्रकल्पग्रस्तांवर अन्यायकारक असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले आहे.

सिडकोमार्फत ही घरे बांधकामे नियमित करण्याची कोणती कार्यवाही चालू आहे याबाबत काहीही माहिती उपलब्ध होत नसून त्यामुळे सर्व ग्रामस्थ, लोकप्रतिनिधींमध्ये संभ्रम आहे. वास्तविक या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांना दिलासा देण्यासाठी सिडकोतर्फे त्वरित कृती होणे आवश्यक असताना, तसे काही निदर्शनास येत नाही. तरी प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली बांधकामे नियमित करण्याच्या दिनांक २३ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी सिडकोला निर्देशित करण्यात यावे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात अधोरेखित केले असून या संदर्भात प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळण्यासाठी या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून प्रकल्पग्रस्तांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी केली आहे.



# पनवेलमध्ये शिवरायांना मानाचा मुजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पनवेल महापालिकेतर्फे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याला आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, दिबासाहेबांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, शहर अध्यक्ष अनिल भगत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, मुकीत काझी, भाजपच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, यांच्यासह इतर लोकप्रतिनिधींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यानंतर शहरात हजारो शिवप्रेमींच्या उपस्थितीत भव्य मिरवणुक झाली. श्री छत्रपती शिवाजी महाराज अर्धाकृती पुतळा टपाल नाका येथे या मिरवणूकीचा समारोप झाला. यानंतर आयोजित स्पर्धांचे पारितोषिक वितरण झाले.

पनवेल शहरात महाराजांच्या पुतळा परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.





**उलवे नोड : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी रामशेठ ठाकूर मैदानावर महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीवर आधारित मराठमोळा कलाविष्कार असलेला महाराष्ट्राची महासंस्कृती हा दर्जेदार कार्यक्रम सादर झाला. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.** (वृत्त उद्याच्या अंकात)

# सर्वांनी शिवरायांचे विचार जगायला हवेत -लोकनेते रामशेठ ठाकूर

## गव्हाण विभागात शिवजयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती गव्हाण यांच्यातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव सोहळा गव्हाण-कोपर येथे मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांनी आपल्या आयुष्यात खूप कष्ट उपसले, त्यांनी फक्त रयतेचाच विचार केला, त्यामुळे सर्वांनी शिवरायांचे विचार जगायला हवेत, असे प्रतिपादन केले.

यासोबत कार्यक्रमाला उपस्थित असलेले काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले की, स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांचे निधन झाल्यानंतर त्यांचे कार्य अविरतपणे लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी पुढे सुरू ठेवले. लोकनेते रामशेठ ठाकूर हे परिस आहेत. ज्यांना ज्यांना त्यांचा स्पर्श झाला त्यांचे सोने झाले, असे सांगून गव्हाण विभागाचा विकास होण्यामागे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सिंहाचा वाटा आहे, असे मत महेंद्र घरत यांनी व्यक्त केले.

या जयंती सोहळ्याला पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, समितीचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य शासनाकडून किल्ल्यांचे संवर्धन सुरू -मुख्यमंत्री फडणवीस

## ■ किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव साजरा





**पुणे : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित किल्ले हे आमच्याकरीता मंदिरापेक्षाही मोठे असून त्यांचे जतन आणि संवर्धनाचे काम राज्य शासनाच्या वतीने सातत्याने सुरू आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यावेळी ते बोलत होते.

हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक, युगपुरुष, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजन्मस्थळी किल्ले शिवनेरी, जुन्नर, पुणे येथे झाला. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित शिवप्रेमींना संबोधित केले.

या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वप्रथम जगभरातील तमाम शिवप्रेमींना शिवजन्मोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. २०३० साली छत्रपती शिवरायांची ४००वी जन्मजयंती साजरी होणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शिवनेरी भूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. तसेच राज्य पोलिसांच्या तुकडीने छत्रपती शिवरायांना मानवंदना देखील अर्पित केली. या वेळी शिवकालीन साहसी खेळांचेही प्रात्यक्षिक उपस्थितांसमोर झाले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री आशिष शेलार व इतर मान्यवर उपस्थित होते.

# रायगडात ठाकरे गटाला गळती

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात दिवसेंदिवस शिवसेना उबाठा गटाला धक्का बसताना दिसत आहे. सुधागड तालुक्यातील ठाकरेच्या शिवसेनेवर ठाम असलेले रायगड जिल्हा उपसंघटक राजेंद्र राउत, जिल्हा युवा सेना समन्वय आशिष यादव, युवा सेना माजी जिल्हाप्रमुख सचिन डोबले आदींसह प्रमुख पदाधिकारी, नेते व कार्यकर्ते यांनी नुकताच शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

यामुळे शिंदे शिवसेनेला मोठी ताकद मिळाली आहे. तर ठाकरे गटाला धक्का बसला आहे. मंत्रालय मुंबई शिवसेना बाळासाहेब भवन येथे मंत्री भरत गोगावले, मंत्री संजय राठोड, मंत्री संजय शिरसाठ दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर आदी प्रमुखांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश करण्यात आला.

# निकृष्ट दर्जाची विकासकामे करणाऱ्या मेसर्स डी.बी. इन्फ्रावर कारवाई करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीत निकृष्ट दर्जाची विकासकामे करणाऱ्या मेसर्स डी.बी.इन्फ्रा या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर १२ मधील भूखंड क्रमांक १२ बी, सेक्टर ११ मधील भुखंड क्रमांक २३ बी, तसेच आसुडगाव सेक्टर ५, भूखंड क्रमांक २८ येथील उद्यान विकसीत करण्याचे काम मेसर्स डी.बी. इन्फ्रा या ठेकेदारास मिळाले होते, परंतु ठेकेदाराने या तीनही उद्यानाचे काम निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महापालिकेच्या निदर्शनास आणून देत ठेकेदारामार्फत झालेल्या अतिशय निकृष्ठ कामाची योग्य दुरुस्ती करण्याची सूचना केली होती. तसेच तोपर्यंत सदर ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे बिल अदा करण्यात येऊ नये आणि सदचे काम पूर्ण होईपर्यंत या ठेकेदारास पनवेल महानगरपालिकेचे कोणतेही काम देण्यात येऊ नये असेही महापालिकेला कळविण्यात आले होते, मात्र पनवेल महानगरपालिकेमार्फत सदर ठेकेदारावर ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले होते.

याचबरोबर खारघर येथील सहा पेक्षा जास्त निर्माणाधीन असलेल्या उद्यानाच्या संदर्भातही स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारी प्राप्त झाल्याने त्या सर्व उद्यानांची पनवेल महानगरपालिकेचे अभियंता राजेश कर्डिले यांनी प्रत्यक्ष स्थळी संयुक्त पाहणी करण्यात आली होती. या पाहणीत उद्यानांची कामेदेखील अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आले व त्यामुळे सदरच्या कामांची दुरुस्ती करून घेण्यात यावी, असे राजेश कर्डिले यांच्याकडे मागणी करण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात त्याठिकाणी आजपर्यंत कागदी घोडे नाचविण्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे जनतेच्या पैशांचा चुराडा करण्याचे काम ठेकेदाराकडून झाले आहे. (पान २ वर..)

# रायगड जिल्ह्यात शिवजयंती उत्साहात साजरी

## गडकोट किल्ले संवर्धन योजनेत ‘पदमदुर्ग’चा समावेश करणार –खासदार तटकरे

**मुरुड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची राजधानी असणारा किल्ला रायगड हा हेरिटेज म्हणून घोषित करणार असून त्याच बरोबर समुद्री आरमार मजबूत करण्यासाठी व जंजिरा किल्ला जिंकण्यासाठी मुरूडमध्ये बांधण्यात आलेला पदमदुर्ग किल्ला याचा समावेश लवकरच गडकोट किल्ले संवर्धन योजनेत समावेश करणार आहोत, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व खासदार सुनील तटकरे यांनी केले.



प्राचीन व ऐतिहासिक किल्ल्याचे जतन व्हावे व भावी पिढीला या किल्ल्यांचा प्रेरणादायी इतिहास कळण्यासाठी भारत सरकार व राज्य सरकार दोघांनी एकत्र येत गडकोट किल्ले संवर्धन योजना सुरू केली असून पदमदुर्ग किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी तसेच जेट्टी बांधण्यासाठी मोठा निधी प्राप्त करून घेण्यासाठी मी अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करून जास्तीत जास्त निधी आणणार असल्याचेही खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

१९ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवजयंती निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशान्वेय संपूर्ण राज्यातील गड किल्ले स्वछता अभियान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त राबवण्यात आली .त्या अनुषंगाने मुरुड मधील ऐतिहासिक पदमदुर्ग किल्ला स्वछता मोहीम शिवजयंती निमित्ताने राबवण्यात आली .यावेळी असंख्य राष्ट्रवादी कार्यकर्ते व गड प्रेमी युवकांनी व स्वतः खासदार तटकरे हे स्वतः स्वछता मोहिमेत सहभागी होऊन शिवजयंती निमित्ताने विविध कार्यक्रमात सहभागी झाले होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले कि, छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन राज्य सरकार आगामी काळात वाटचाल करणार आहोत.खोरा बंदरातील रस्त्याची कामे लवकरच पूर्ण करणार आहोत. अलेक्झांडर व नेपोलियन यांच्याकडे पुरेसे सैनिक व लढण्यासाठी यंत्रसामुगी होती.परंतु छत्रपती शिवरायांकडे आर्थिक रसद व सैनिक बळ कमी असताना सुद्धा संपूर्ण जगात त्यांचे नाव काढले जाते हि महाष्ट्रासाठी निश्चितच अभिमानस्पद बाब आहे. पदमदुर्ग किल्ल्यावर जाण्यासाठी मुरुड शहरातून नवीन जेट्टी बांधावी यासाठी सुद्धा माझ्यातर्फे प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी महिला अध्यक्ष उमा मुंडे, मनोज भगत, सोशल मीडियाचे हसमुख जैन, अॅड.मृणाल खोत, संजय गुंजाळ, विजय पैर,इस्माईल सिद्दीकी, आशिष हेदुलकर, शीतल घरत, अजित कासार, नम्रता कासार, बाबू नागावकर,शाम कोतवाल, स्मिता खेडेकर उपस्थित होते.

## विकी कौशल रायगडावर नतमस्तक

**महाड : प्रतिनिधी**

छावा चित्रपटाच्या यशानंतर अभिनेता विकी कौशलने आज शिवजयंतीचे औचित्य साधून किल्ले रायगडावर जाऊन शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले.

आजचा दिवस माझासाठी सर्व काही आहे तो छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच आहे, असे विकीने म्हटले. तसेच, छावा सिनेमाला मिळत असलेल्या प्रतिसादबद्दलही त्याने आनंद व्यक्त केला आहे. या वेळी मंत्री आदिती तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे उपस्थित होते.



किल्ले रायगड वरती गेली अनेक वर्षांपासून रायगड रोप–वे हा प्रकल्प शिवप्रेमी आणि पर्यटकांची रायगडावर जाण्या येण्याची उत्तम सुविधा पुरवत असताना रोपवेची व्यवस्था उत्तम आहे, असेही अभिनेता विकी कौशिक यांनी म्हटले.

सर्वत्र जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. महाड तालुक्यामध्येदेखील या शिवजयंतीचा उत्साह दिसून आला. सकाळपासूनच ढोल, ताशे, नगारे यांच्या तालावर नृत्य करत शिवज्योती दाखल झाल्या. यामुळे सर्वत्र शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महाडसह संपूर्ण परिसरामध्ये मोठ्या उत्साहात साजरी झाली.

## रोह्यात शिवजयंतीचा सोहळा

**रोहे : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव रोहा शहरात दिमागदार पद्धतीने बुधवारी सायंकाळी पार पाडला. राम मारुती चौक येथून पालखी मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली.



छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष, ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजी, छत्रपती शिवाजी महाराज विराजमान झालेल्या पालखीसह मिरवणुकीला सुरुवात झाली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज विराजमान झालेले रथ होते. शालेय विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे सादर केले. या वेळी विद्यार्थ्यांनी लेझीम खेळ दाखवला. विद्यार्थ्यांनी शिवकालीन लाठीकाठीचा खेळ या वेळी दाखवला.

या मिरवणुकीत रोहेकर फेटा घालून पारंपरिक वेशभूषा परिधान करून सामील झाले होते. या वेळी संपूर्ण रोहा शहर शिवमय झाल्याचे दिसून आले.

## पेणमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

### आमदार रविशेठ पाटील यांच्यासह विविध संघटनाच्या वतीने शिवरायांना अभिवादन

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महाराजांच्या पुतळ्याला पेण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील,आमदार रविशेठ पाटील, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी वाहतूक संघटनेच्या माध्यमातून राष्ट्रवीर संघ युद्धकला प्रशिक्षण संस्कृती संवर्धनच्या विद्यार्थी दिव्यांका उदेकर व वेद वास्कर यांनी शिवकालीन मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

पेण मध्ये शहर तसेच ग्रामीण भागात शिवजयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाराजांच्या पुतळ्याला शिवजयंती निमित्त शिवप्रेमींकडून अभिवादन तसेच शिवज्योत दाखवून मनाचा मुजरा करण्यात आला. या दिनी विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज संपूर्ण पेण तालुका भगवामय होऊन शिव गर्जनानी निनादुन गेले होते.



## ‘सिडको’चे हक्काचे घर मिळालेल्यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वसामान्यांना परवडणारी, हक्काची आणि दर्जेदार घरे मिळाली पाहिजेत, त्याचे जीवनमान उंचावले पाहिजे, सर्वांचे घरांचे स्वप्न पूर्ण झाले पाहिजे. यासाठी सिडको, म्हाडा यासारख्या संस्था पारदर्शकपणे काम करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी २१,३९९ सदनिकांच्या महासोडतीच्या माध्यमातून एकूण १९,५१८ नागरिकांचे सिडकोचे ‘माझ्या पसंतीचे सिडको घर’ या योजनेद्वारे हे स्वप्न पूर्ण होत असल्याने हक्काची घरे मिळालेले सर्वजण भाग्यशाली असून त्यांच्या अभिनंदनाची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केली.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिडकोच्या ‘माझ्या पसंतीचे सिडको घर’ या लॉटरीची ऑनलाईन सोडत काढण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सहव्यवस्थापकीय संचालक, शान्तनु गोयल, डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, गणेश देशमुख, मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओद्वारे दिलेला संदेश प्रसारित करण्यात आला.त्यामध्ये त्यांनी सिडकोची गृहनिर्माण योजना हे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकारणारे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले व यशस्वी अर्जदारांना शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्या संदेशाचे या वेळी वाचन करण्यात आले

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सिडकोच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वांत मोठी लॉटरी आहे. ही घरे टाटा, एल.एण्ड टी., शापूरची यांच्या सहभागाने बांधली असल्याने ती अतिशय दर्जेदार असून रेल्वे स्टेशन्स, विमानतळाच्या जवळ असल्याने सामान्यांना त्याचा फायदा होणार असल्याचे सांगितले

एमटीएचएल प्रकल्पाला काही एनजीओ, पर्यावरणवाद्यांनी या प्रकल्पास विरोध दर्शवून या प्रकल्पामुळे फ्लेमिंगो पक्षी नवी मुंबईतून कमी होतील, असे सांगितले होते. मात्र त्यावेळी रिमुव्हर्स सर्कुलेशन ड्रेन, नॉईस बॅरिअर या तंत्रज्ञानांचा वापर केल्यामुळे एमटीएचएल प्रकल्पामुळे फ्लेमिंगोची संख्या कमी न होता आणखी वाढली. यावरून हे शासन प्रो इन्व्हायरमेंट प्रकल्प करते आहे, हे दिसून आले.

## ‘नागावमध्ये पोलीस चौकी करणार’

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वचछ,सुंदर व सुरक्षीत समुद्र किनारा लाभलेले अलिबाग तालुक्यातील नागाव हे पर्यटनस्थळ म्हणनू पर्यटकांच्या पंसतीस उतरले असून तेथील वाढत्या पर्यटनाने सुरक्षीतेचा प्रश्न ऐरणीवर आहे. त्या निमित्ताने आयोजीत चर्चा सत्रात बोलतांना कोकण परिक्षेत्र पोलिस महानिरिक्षक संजय दराडे यांनी नागाव मध्ये पोलिस चौकी लवकरच सुरू करणार असल्याचे सांगितले

नागाव ग्रामपंचायत सरपंच हर्षदा मयेकर यांनी ग्रा.प. सभागृहात दि. १७ फेब्रुवारी रोजी नागावची सुरक्षीतता याबाबतचे चर्चासत्राचे नियोजन केले होते. यावेळी प्रमुख अतिथी कोकण परिक्षेत्र ॑ पोलिस महानिरिक्षक संजय दराडे, रायगड पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे,व अपर पोलिस अधिक्षकअभिजीत शिवथरे, व पोलिस निरिक्षक किशोर साळे, . नंदुशेठ मयेकर, निखिल मयेकर, ग्रामपंचायत सदस्य॑ ग्रामस्थ, उपस्थित होते

## महापारेषणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन), नितीन कांबळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), सचिन खडगी, उपमुख्य दक्षता अधिकारी किशोर पाटील, प्रशांत गोरडे यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान १ वरुन

## उलवे नोडमधील शिवसृष्टीतील मैदानाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव

या अनुषंगाने या ठिकाणी असलेल्या मैदानाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा ठराव दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत घेऊन तो पारित झाला होता. आता या मैदानाचे नामकरण शिवजयंतीच्या पवित्र दिवशी झाले असून हे मैदान रामशेठ ठाकूर मैदान या नावाने ओळखले जाणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रत्येक समाजात कार्य आहे. त्यांनी सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी आपले आयुष्य खर्ची केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे मोठ्या उंचीचे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. राजकीय चपला बाजूला सारून ते समाजासाठी काम करत असतात, सढळ हस्ते मदत करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम ५० वर्षांहून अधिक काळापासून करीत आले आहेत. त्यामुळे त्यांना दानशूर व लोकनेते हि उपाधी लोकांनी प्रदान केली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर स्थानिकांच्या हक्कासाठी लढणारे नेते अशीही त्यांची आणखी एक ओळख सर्वश्रुत आहे. त्यामुळे उलवा नोडमध्ये उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टीच्या अनुषंगाने येथील मैदान लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने ओळखले जाणार असून येथील शिवसृष्टी आणि हे मैदान विभागाच्या नावलौकिकात भर टाकणारे ठरणार आहे.

## निकृष्ट दर्जाची विकासकामे करणाऱ्या मेसर्स डी.बी. इन्फ्रावर कारवाई करा

सार्वजनिक निधीचा अपव्यय होऊ नये आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात तसेच स्थानिक नागरिकांकडून आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी या संदर्भात महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांना पत्र देऊन सखोल चौकशी करून ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे निर्देश महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्याचे समजते.

## श्रीवर्धनमध्ये सुपारी लागवडीला नवी उभारी

### चक्रीवादळानंतर शेतकऱ्यांचा संघर्ष आणि पुनर्निर्माण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुका सुपारी उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे, चक्रीवादळाने सुपारीच्या लागवडीला जबरदस्त फटका दिला होता. या तालुक्यात श्रीवर्धन, दिवेआगर, आदगाव आणि वेळास मध्ये सुपारीच्या विविध जातींची मोठ्या प्रमाणावर लागवड होती. विशेषतः ’रोठा सुपारी’ या जातीला राज्यभरात अत्यधिक मागणी होती, कारण तिचा स्वाद आणि दर्जा खूपच खास होता. यामुळे, तालुक्याला सुपारी उत्पादनात एक विशेष स्थान प्राप्त झाले होते.

चक्रीवादळाने सुपारीच्या बागायतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. झाडे उन्मळली, पाणी व्यवस्थापनाचे नुकसान झाले, आणि बंधारे व सिंचन व्यवस्थेचा नाश झाला. शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. सुपारी व्यवसाय अडचणीत आला होता.

तथापि, संकटाच्या या काळातही श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांनी हार मानली नाही. त्यांच्यापुढे असलेल्या कठीण परिस्थितीला तोंड देत, त्यांनी आपल्या शेतीचे पुनर्निर्माण सुरु केले. सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेत आपल्या शेतीचे पुनर्निर्माण केले. बंधारे, वाफे आणि सिंचन व्यवस्थेची पुनर्बांधणी केल्याने पर्यावरणीय समतोल राखला गेला. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाली आणि सुपारी उत्पादनामध्येही मोठी वाढ झाली.

शेतकऱ्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर सुपारीची पुनर्लागवड केली आहे, ज्यामुळे श्रीवर्धन तालुका पुन्हा एकदा सुपारी उत्पादनाच्या क्षेत्रात चमकलेला आहे. दिवेआगर, आदगाव, वेळास आणि श्रीवर्धनच्या इतर भागात सुपारी लागवडीला जोर मिळाला आहे. त्यामुळे तालुक्यात एक नवा उत्साह निर्माण झाला आहे.



**सुपारीच्या उत्पादनात सुधारणा आणि विक्रीत वाढ**

सन २०२० ते २०२१ मध्ये ६,७६३ किलो सुपारी विकली गेली.सन २०२१ ते २०२२ मध्ये १२,०७२ किलो सुपारी विकली गेली. सन २०२२ ते २०२३ मध्ये ७३१ किलो सुपारी विकली गेली. सन २०२३ ते २०२४ मध्ये १०,०२४ किलो सुपारी विकली गेली. सन २०२४ ते २०२५ (फेब्रुवारी) मध्ये ८,६५५ किलो सुपारी विकली गेली.एकूण विक्री ४४,८२५ किलो इतकी झाली आहे. त्याचप्रमाणे, चक्रीवादळानंतर शेतकऱ्यांनी ३१,७७८ सुपारीची रोपे विकत घेतली.

**वादळामुळे श्रीवर्धन तालुक्यातील बागायतदारांचे सुपारीच्या झाडांचे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक तोटा झाला. तथापि, शासनाने बागायतदारांना सुपारीची नवीन रोपे वितरित केली. यामुळे, शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा सुपारीच्या झाडांचे क्षेत्र वाढवले आणि नुकसान भरून काढले. सुपारीच्या नवीन रोपांच्या मदतीने, क्षेत्राचे पुन्हा व्यापले जाणे शक्य झाले. या उपायाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आणि त्यांचे उत्पन्न सुधारले. –डॉ. सिद्धेश्वर सावंत, प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र**

# पनवेलमध्ये शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीमध्ये शहरातील शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि विविध सांस्कृतिक गट मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर ढोल-ताशा पथक, लेझीम पथक, चित्ररथ आणि शिवकालीन वेशभूषा परिधान केलेले कलाकार यांचा सहभाग असलेली रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली.

वर्षानुवर्ष लोटून गेली पिढ्यानपिढ्या बदलत गेल्या पण महाराजांविषयीचा अभिमान हा जराही ढळलेला नाही याउलट येणाऱ्या नव्या पिढीमध्ये त्यांच्याविषयी प्रचंड अशा अभिमानाची भावना पाहायला मिळतीये आणि म्हणूनच शहरातील या मिरवणुकीला इतक्या सकाळी तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते पनवेल महानगरपालिकेने आयोजित केलेल्या मिरवणुकीला आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

शिवचरित्रावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, शिवगाथा सादरीकरण आणि विविध देशभक्तिपर गीतांचे आयोजनदेखील करण्यात आले.

या मिरवणुकीमध्ये जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रांताधिकारी पवन चांडक, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, दिवंगत नेते दि.बा पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, नितीन पाटील, राजश्री वावेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवदास कांबळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य निलेश पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेतकर, संजय भगत, सुमित झुंजारराव, अमरीष मोकल, सतीश पाटील, उपायुक्त सर्वश्री कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, सहायक संचालक नगररचना केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार, स्मिता काळे, डॉ.रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, महापालिकेचे सर्व विभाग प्रमुख, सर्व अधिकारी, सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लेझीम पथक आणि चित्ररथांना महापालिकेतर्फे विशेष बक्षीस



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने लोकसहभागातून भव्य मिरवणुकीच तसेच आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पोवाडा आणि बक्षीस समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मिरवणुकीत सहभागी झालेल्या लेझीम पथकास आणि चित्ररथांना विशेष बक्षीस ही महापालिकेच्या वतीने देण्यात आले.

यामध्ये चित्ररथामध्ये प्रथम पारितोषिक आगरी शिक्षण संस्था खांदा कॉलनी, द्वितीय पारितोषिक पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग, तृतीय पारितोषिक लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्रजी माध्यम शाळा कामोठे यांना मिळाले तर लेझीम मध्ये प्रथम पारितोषिक के व्हि कन्या विद्यालय पनवेल,द्वितीय पारितोषिक सेंट जोसेफ स्कूल तर तृतीय पारितोषिक महात्मा इंटरनॅशनल स्कूल यांना मिळाले.

पनवेल शहरातील फडके नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी महापौर डॉक्टर कविता चौतमौल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, उपायुक्त कैलास गावडे, वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, यांच्यासह माजी नगरसेवक-नगरसेविका आणि नागरिक उपस्थित होते.



## भाजपतर्फे वेशभूषा स्पर्धा उत्साहात









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ च्या वतीने मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

पनवेल शहरातील गावदेवी मंदिर जवळ झालेल्या या स्पर्धेला ७५ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या वेशभूषा स्पर्धेला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, भाजप उत्तर रायगड जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, शहराध्यक्ष अनिल भगत, राजश्री वावेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी,माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, युवा मोर्चाचे अध्यक्ष मयुरेश नेतकर, सुमित झुंजारराव, संजय भगत, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेय यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## जेएनपीएचा गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेडच्या बांधकामासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. मंगळवारी (दि.१८) एनएमडीसी ग्रुप पीजेएससी (नॅशनल मरीन ड्रेजिंग कंपनी पीजेएससी) सह महत्त्वपूर्ण सहकार्य स्थापित केले.

भारताच्या बंदरांच्या पायाभूत सुविधा वाढवण्याची आणि वाढवण बंदराला जागतिक स्तरावर पहिल्या १० बंदरांपैकी एक बनवण्याची जनेप प्राधिकरणाची बांधिलकी या साहचर्याने दाखवून दिली आहे. जनेप प्राधिकरणाचे आणि वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेष शरद वाघ आणि यासीर झघलौल यांनी या संदर्भातील करारपत्रांची देवाणघेवाण केली.

सामंजस्य करारानुसार, एनएमडीसी ग्रुप पीजेएससीने वाढवण बंदराच्या ड्रेजिंग), रिक्लेमेशन आणि किनाऱ्याचे संरक्षण याकरता वाढवण किनारपट्टीच्या भू किनाऱ्याच्या विकासासाठी अंदाजे २१,००० कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित केली आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून एनएमडीसी ग्रुप पीजेएससी भारताच्या सागरी विकासासाठी आपली दृढ वचनबद्धता दर्शवित आहे. एनएमडीसी ग्रुप पीजेएससीचे मुख्य कार्यालय अबू धाबी, यूएई येथे असून हा ग्रुप संपूर्ण मध्य पूर्व आणि त्यापलीकडेदेखील काम करतो. अभियांत्रिकी, सागरी ड्रेजिंग, खरेदी आणि बांधकाम क्षेत्रातील एनएमडीसी ग्रुप पीजेएससी एक सुप्रसिद्ध नाव आहे.

जनेप प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेष शरद वाघ म्हणाले, जनेप प्राधिकरण आणि एनएमडीसी ग्रुप पीजेएससी यांच्यातील सामंजस्य करार हा वाढवण बंदराला जागतिक दर्जाचे सागरी केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

केंद्रीय बंदरे, जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल आणि केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्यमंत्री शांतनु ठाकूर यांच्या उपस्थितीत व्हीपीपीएलसाठी अनेक सामंजस्य करार यापूर्वी करण्यात आले आहेत.

## एमएनएम विद्यालयात शिवजयंती उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे छत्रपती शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्याध्यापिका प्रणिता गोळे यांनी शिवप्रतिमेस पुष्पहार घालून मानवंदना दिली. शाळेचे पर्यवेक्षक अरुण जोशी, शाळेचे समन्वयक राहुल म्हात्रे, उपस्थित सर्व शिक्षक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी शिक्षकेतर कर्मचारी यांनीवंदन केले.



**कळंबोली : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भाजप कळंबोली पक्ष कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून मानवंदना दिली.**

# मालमत्ता कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला

## पनवेल मनपा तिजोरीत रोज कोट्यवधींची वसुली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने नागरिकांच्या मनातील शंकाचे निरसन प्रसिध्दी माध्यमातून करण्यात आल्यानंतर कर भरण्यास नागरिकांचा प्रतिसाद वाढला आहे. गेल्या काही दिवसापासून कळंबोली, कामोठे, खारघर ,पनवेल प्रभागातून एक कोटी हून अधिक थकित कर वसूल होत आहे. दरम्यान, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सुचनेनंतर उपायुक्त स्वरूप खारगे यांनी जप्तीपुर्व नोटीसानंतर सात दिवस दिवसांचा कालावधी पुर्ण होऊनही मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना वॉरंट नोटीसा बजावण्यास सुरवात केली आहे.

आतापर्यंत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटीसा व २७ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनूसार जप्ती मोहीम अधिक तीव्र करण्याचा इशारा महापालिकेच्यावतीने देण्यात आला आहे.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे, परंतु आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या, अशा थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी उपायुक्त स्वरूप खारगे व कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून पनवेल,कामोठे खारघर तसेच कळंबोली थकबाकीदारांना जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात येत आहेत. याचाच परिणाम म्हणजे चारही प्रभागामधून सुमारे आजपर्यंत ३२८ कोटींचा भरणा झाला आहे.

दरम्यान, मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने तसेच महापालिकेच्यावतीने प्रसिध्दी माध्यमातून केलेल्या आवाहनामुळे नागरिकांच्या मनातील शंकाचे निरसन झाल्याने कर भरण्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून मालमत्ता कराच्या भरण्यामध्ये भरघोस वाढ होताना दिसत आहे.

# होमगार्डच बनला तोतया पोलीस

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून फसवणूक करणार्या तोतया पोलिसास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून अधिक तपासात तो रायगड येथे होमगार्ड असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याने पनवेल शहर तसेच खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतीतील बतावणीचे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**दोन गुन्हे उघडकीस**

श्लोक म्हात्रे हा त्याच्या मित्रासह सिकेटी कॉलेज जवळ असताना एक खाकी कलरची पॅन्ट व शर्ट घातलेला एक इसम त्याच्या जवळ आला व त्याने आपण पोलीस असल्याचे सांगून वडाळे तलाव येथे काही मुलांनी भांडण केले आहे व ते पेणचे आहेत असे सांगून त्याने माझ्या बरोबर पनवेल शहर पोलीस ठाणे येथे चल असे सांगून त्याला बरोबर घेतले व त्याला त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन ज्याची किंमती जवळपास ७० हजार रुपये इतकी आहे ती काढण्यास सांगून ती हिसकावून तो पसार झाला होता.

पोलिसांच्या पथकाने मुलाने दिलेल्या माहितीच्या आधारे अधिक शोध घेतला असता आरोपी रायगड परिसरात लपला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विशेष पथकाने त्या ठिकाणी जावून आरोपी रोहित अनिल भोसले (वय २४, धंदा होमगार्ड) याला ताब्यात घेवून अधिक चौकशी केली. तेव्हा अशा प्रकारचा गुन्हा खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुद्धा केल्याचे निष्पन्न झाले आहे. याच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.





**पनवेल : शिवजयंतीनिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ढोंगऱ्याचा पाडा आणि तळोजा फेस २ येथे निर्दोष केणी यांच्या आयोजित कार्यक्रमाला भेट दिली. या वेळी आयोजकांनी त्यांचे स्वागत केले. सोबत भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी.**

## संपादकीय

# थंडा थंडा कूल कूल

हातात कुठलाच मुद्दा उरलेला नसल्याने महायुतीमध्येच सारे काही आलबेल नाही अशी हाकाटी उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी पिटण्यास सुरूवात केली आहे. मविआचे इतर नेतेही त्यांची री ओढत आहेत. वास्तविक महायुतीतील तथाकथित मनभेदाचे अंदाज-आडाखे बिनबुडाचे आहेत हे वेगळे सांगायला नको. या आरोपांना ना शेंडा, ना बुडखा.

**खूप वर्षांपूर्वी घामोळ्यावरील खात्रीशीर उपाय मानल्या जाणाऱ्या एका पावडरची जाहिरात 'थंडा थंडा कूल कूल' या ओळीनिशी केली जात असे. ती जाहिरात खूप गाजली होती. महाराष्ट्रातील विरोधी पक्षांना सध्या राजकीय घामोळ्याचा त्रास होत आहे असे दिसते. प्रचंड जनादेशानंतर महायुतीचे सरकार सत्तेवर आले. त्यावेळी झालेल्या निवडणुकीत विरोधी महाविकास आघाडीचा अक्षरश: पालापाचोळा झाला. मविआचे नेते अजुनही त्या धक्क्यातून बाहेर आलेले नाहीत. त्यांच्यापैकी काही नेत्यांचे तर जवळपास डोकेच फिरले आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. ऊठसूट महायुती सरकारवर बेलगाम आरोप करण्याचे सत्र त्यांनी आरंभले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारी कामकाज वेग घेताना दिसू लागले आहे. असे असताना, फडणवीस यांनी सत्तेतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेच्या आमदारांची सुरक्षा कमी केल्याचा आरोप करण्यात आला. तो मुळातच हास्यास्पद आहे. राजकीय नेत्यांना पुरवण्यात येणाऱ्या वैयक्तिक सुरक्षा व्यवस्थेचा गृहविभागातर्फे वारंवार आढावा घेतला जातो. ज्यांच्या जिवाला धोका नाही अशा नेत्यांची सुरक्षाव्यवस्था कमी करणेच श्रेयस्कर असते. त्यामुळे पोलिस दलावरचा ताण कमी होतोच. त्याशिवाय संबंधित राजकीय नेत्याच्या वावरण्यालाही थोडी अधिक मोकळीक मिळते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी फक्त शिवसेनेच्याच नव्हे तर अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि स्वत:च्या भारतीय जनता पक्षाच्या आमदारांची सुरक्षा व्यवस्थाही कमी केली आहे. या व्यावहारिक निर्णयाला राजकीय वळण देण्याचा थिल्लर प्रयत्नही विरोधकांनी केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे 'रुसले' असून फडणवीस यांना न जुमानता आपले स्वत:चे प्रतिसरकार शिंदे चालवत असल्याचा सनसनाटी आरोपही केला गेला. याला तर विनोदाचा कडेलोटच म्हणायला हवे. शिंदे यांनी उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या अंतर्गत वैद्यकीय कक्ष सुरू केला कारण आरोग्य खाते त्यांच्याच पक्षाशी संलग्न आहे. असे कक्ष उभारणे हा निरनिराळ्या खात्यांच्या समन्वयाच्या सोयीचा भाग असतो. परंतु राऊत आणि कंपनीला हे कोण सांगणार? मंत्रिमंडळ बैठकीची कार्यक्रमपत्रिका किंवा अजेंडा तसेच संभाव्य निर्णय याबद्दल नेहमीच उलटसुलट बातम्या येत असतात. परंतु त्यामध्ये अंदाजांचा भाग अधिक असतो. अंदाजांमध्ये वावगे असे काही नाही. परंतु मंत्रिमंडळाचा अजेंडा कुठल्या तरी मार्गाने माध्यमांकडे लीक होत असेल तर मात्र ती गंभीर बाब मानली पाहिजे. कारण याच संदर्भामध्ये मंत्र्यांनी गोपनीयतेची शपथ घेतलेली असते. अशाप्रकारे मंत्रिमंडळाचा अजेंडा लीक होत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होईल, असा सज्जड इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. यामुळे तरी काही जणांचे डोळे उघडतील, अशी अपेक्षा आहे. फडणवीस, शिंदे, पवार यांच्या महायुती सरकारमध्ये कुठलेही मनभेद नाहीत आणि मतभेदही नाहीत, असा स्पष्ट निर्वाळा या तिन्ही ज्येष्ठ नेत्यांनी दिला आहे. आमच्यामध्ये सारे काही थंडा थंडा कूल कूल आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे. त्यांच्या या उद्गारांमुळेच विरोधकांच्या राजकीय घामोळ्याची आठवण झाली.**

# पुस्तकांचं गाव भिलार... वाट पाहतंय आपली!







महाबळेश्वर आणि पाचगणी या जगप्रसिद्ध थंड हवेच्या ठिकाणी स्ट्रॉबेरीचे गाव अशी ओळख असलेल्या निसर्गाच्या अप्रतिम सौंदर्याने नटलेले सह्याद्रीच्या रांगांमध्ये वसलेले असं भिलार गाव पुस्तकांचं गाव झालं. मराठी साहित्याला सोनेरी झळाळी देणारा आणि प्रत्येक रसिक वाचकला दोन्ही बाहु पसरुन खुलेपणानं आमंत्रण देणारा असा हा प्रकल्प देशभर गाजला रोजचे पर्यटक तर येतातच, पण आजपर्यंत मोठ्या प्रमाणात शालेय सहली इथे आल्या लाखोंहून अधिक विद्यार्थ्यांना पुस्तकाच्या गावाने मोहून टाकले. स्ट्रॉबेरीची गोडी आणि प्रत्येक पुस्तकाच्या घरात जाऊन फोटो काढण्याचा मोह यातून भिलार गावाचे आकर्षण वाढले पुस्तकांचं भारतातलं पहिलं गाव महाराष्ट्राबाहेरच्या लोकांनाही भुरळ घालत आहे.

दिल्ली येथे होत असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांच्या पार्श्वभूमीवर या गावाला दिलेल्या भेटीच्या आठवणी पुन्हा रुंजी घालू लागल्या आहेत. ४ मे २०१७ या दिवशी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभागाच्या वतीने अनोखं पुस्तकांचं गाव भिलार साकारण्यात आलं. आज या पुस्तकाच्या गावामध्ये ३५ घरांमध्ये वेगवेगळया साहित्य प्रकाराची पुस्तकं ठेवण्यात आली आहेत. वाचन संस्कृती वृद्धींगत करण्यासाठी वाचन-चळवळ वाढविण्यासाठीचा हा प्रकल्प. प्रकल्पास भेट देणाऱ्या वाचक/पर्यटकांना मराठी भाषेची समृद्धी कळावी म्हणून मराठी भाषेतील नवे-जुने लेखन, संत साहित्य, कथा, कादंबरी, कविता, ललित व वैचारिक, चरित्रे-आत्मचरित्रे, स्त्री साहित्य, क्रीडा, बालसाहित्य आणि इतिहास या वेगवेगळ्या साहित्य प्रकाराची दालने उभी केली आहेत. निवडलेल्या ३५ घरांवर विविध प्रकारची चित्र रेखाटण्यात आली आहेत. चित्राच्या संगतीनुसार त्या घरात वाचकाला साहित्य उपलब्ध होते.




ज्या घरांच्या भिंतीवर निसर्ग चित्र काढण्यात आली आहेत, त्या घरात निसर्ग चित्रण अथवा प्रवास वर्णनपर साहित्य ठेवण्यात आले आहे. ऐतिहासिक चित्र रेखाटलेल्या घरात ऐतिहासिक साहित्य वाचनासाठी ठेवण्यात आले आहे. संतांची चित्र काढलेल्या ठिकाणी संतसाहित्य-अध्यात्मिक पुस्तकांची भेट वाचकांना होते. अशा प्रकारे केवळ चित्रांवरुन पर्यटकाला त्या त्या घरात कोणते साहित्य वाचनाला उपलब्ध आहे याची माहिती मिळते.

केवळ एक सरकारी वाचनालय उभारण्यापेक्षा या प्रकल्पात स्थानिकांना जास्तीत जास्त सहभागी करण्यात आले आहे. ३५ घरांत वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली आहेत. येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला त्यांच्या आवडीप्रमाणे वाचन करता येते. जवळपास मोठ्या प्रमाणात मराठी पुस्तके या गावात ठेवण्यात आली आहेत आणि त्यात दिवसेंदिवस भर पडते आहे.

प्रकल्पासाठी निवडलेल्या घरांची व ठिकाणांची नावे : हिलरेंज हायस्कूल - बालसाहित्य, नितीन प्रल्हाद (बाळासाहेब) भिलारे-कादंबरी, 'अनमोल्स इन' राहूल भिलारे-महाराष्ट्र प्रदेश, मराठी भाषा व संस्कृती, 'शिवसागर' सुभाष भिलारे-विज्ञान, श्री हनुमान मंदिर-नियतकालिके व साहित्यिक प्रदर्शनी, 'साई व्हॅली पॅलेस' विजय भिलारे-इतिहास, , गणपत भिलारे-'दिवाळी अंक', 'कृषी कांचन' शशिकांत भिलारे-चरित्रे व आत्मचरित्रे व बोलकी पुस्तके, 'मंगलतारा' प्रशांत भिलारे-शिवकालीन इतिहास व गडकिल्ले, अभिजित दत्तात्रय भिलारे-परिवर्तन चळवळ, समाजसुधारकांचा व सुधारणांचा इतिहास, प्रवीण भिलारे-कथा, अनिल भिलारे-स्त्री साहित्य, नारायण वाडकर -लोकसाहित्य, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-बालसाहित्य, सुहास काळे-ललित गद्य व वैचारिक, श्रीराम मंदिर साहित्यिक (प्रदर्शन) आणि भाषिक व साहित्यिक खेळ, संतोष सावंत-विनोदी, जिव्हाळा, आकाश भिलारे-विविध लोकप्रिय व पुरस्कार विजेते, गणपत पारठे-विविध कलांविषयक, मयूर रिसॉर्ट, अजय मोरे-निसर्ग, पर्यटन आणि पर्यावरण, श्री जननीमाता मंदिर, संत साहित्य, श्री जननीमाता मंदिर (श्री गणपती मंदिराजवळ)-साहित्यिक प्रदर्शनी आणि गिरीजा रिसॉर्ट-कविता.

शासनाने राबविलेला अत्यंत चांगला उपक्रम आहे. येथे आल्यानंतर दूर्मिळ पुस्तके पाहायला, वाचायला मिळाली. मोबाईल, टीव्हीच्या विश्वात वाचनसंस्कृती टिकविणारा एक चांगला उपक्रम आहे.

असे पुस्तकावे गाव कुठेही पाहिले नाही. येथील पुस्तके पाहुन वेगळाच आनंद झाला. शासनाचा हा उपक्रम स्तुत्य आणि आगळा वेगळा आहे. अशा भावना पुस्तकाच गाव भिलार येथे येणारे पर्यटक व्यक्त करीत आहेत.

विविध घरांमध्ये शिवाजी महाराज, शिवकालीन इतिहास व गडकिल्ले या विषांवरील पुस्तके ठेवण्यात आली आहेत. परिवर्तन चळवळ, समाजसुधारकांचा व सुधारणांचा इतिहास, कथा, कांदबऱ्या, कविता संग्रह यासह अनेक पुस्तके ठेवण्यात आली आहेत. या गावामध्ये साक्षात ज्ञानाची गंगा आली आहे. गावामध्ये पुस्तक प्रेमी, पीएचडी करणारे विद्यार्थी येत आहेत. या गावाची स्ट्रोबेरी बरोबर पुस्तकाच गाव अशी ओळख निर्माण झाली आहे.

पुस्तकं आयुष्याला वळण देतात. अनुभव, विचार, ज्ञान बळकट करतात. पुस्तकाची गोडी लागण्यासाठी पुस्तकांचा सहवासही महत्वाचा असतो त्यासाठी पुस्तकाचं गाव भिलार हा एक अभिनव उपक्रम आहे आणि गावकऱ्यांचा सहभाग याचं उत्तम उदाहरण असणार पुस्तकाचं गाव भिलार हा अभिवन उपक्रम आहे.

**-वर्षा पाटोळे,**
**जिल्हा माहिती अधिकारी, सातारा**

### पुस्तकाचं गावं नेमकं आहे तरी कसं!

* ३५ घरात ४० हजार पुस्तकांचा खजिना.
* पर्यटकांच्या आवडीनुसार वाचनासाठी साहित्य उपलब्ध
* साहित्य प्रकारानुसार दालनातील पुस्तकांची मांडणी - साहित्यानुसार भिंतीवर भित्तीचित्रे
* गावात कथाकथन अनं कविता वाचनाचे आयोजन.
* पर्यटकांच्या भेटीला नामवंत लेखक-प्रकाशक.
* अंधांसाठी ऑडीओ बुक (बोलकी पुस्तके)
* पर्यटकांच्या साक्षीने नव्या कादंबऱ्यांचे प्रकाशन सोहळे



## बदलते तंत्रज्ञान

### स्पॅम कॉल्सच्या त्रासापासून मिळणार मुक्ती; 'ट्राय'चे पाऊल

भारतीय दूरसंचार प्राधिकरण, म्हणजेच TRAIने स्पॅम कॉल्स थांबवण्यासाठी नियम अधिक कडक केले आहेत.




नवीन नियमानुसार, १० क्रमांकांचा गैरवापर थांबेल आणि टेलीमार्केट्सना नवीन नंबर सीरिजचे पालन करावे लागेल. याशिवाय तुम्ही स्पॅम कॉल्स आल्यानंतर सहजपणे तक्रार करू शकाल, ज्यावर दंडात्मक कारवाईदेखील केली जाईल. याबाबत ट्रायने एक्स प्लॅटफॉर्मवर (पूर्वीचे ट्विटर) पोस्ट करून माहिती दिली आहे.

ग्राहक संरक्षण सुधारण्यासाठी TRAIने टेलिकॉम कमर्शियल कम्युनिकेशन्स कस्टमर प्रेफरन्स रेग्युलेशन २०१८मध्ये सुधारणा केली आहे. यानुसार ग्राहक १० क्रमांकावरुन येणाऱ्या टेलीमार्केटिंग कॉलपासून मुक्त होऊ शकतील आणि रिपोर्टिंग प्रक्रियादेखील सुलभ करण्यास सांगितले आहे. यात टेलिकॉम कंपन्यांवर दंडात्मक कारवाईचा उल्लेख करण्यात आला असून कंपन्यांनी मात्र या निर्णयावर आक्षेप नोंदवला आहे.

नवीन नंबर सिरीजचा वापर

TRAIने कमर्शियल कम्युनिकेशनसाठी १० नंबरचे मोबाईल नंबर आधीच ब्लॉक केले आहेत. यासाठी १४० आणि १६०० मालिकेपासून नवीन क्रमांकाची मालिका सुरू करण्यात येणार आहे. १४० क्रमांकाची सिरीज प्रमोशनल कॉलसाठी वापरावी लागेल, तर १६०० क्रमांकाची सिरीज व्यवहाराशी संबंधित कॉलसाठी वापरावी लागेल.

नोंदणी नसलेल्या टेलिमार्केटरवर कारवाई

ट्रायच्या नव्या निर्णयानंतर अनोंदणीकृत टेलिमार्केटर्सवर आळा घालण्यासाठी दंड आकारण्यात येणार आहे. जर टेलीमार्केटरने पहिल्यांदा नियमांचे उल्लंघन केले तर १५ दिवसांसाठी निलंबन केले जाईल, तर पुन्हा नियमांचे उल्लंघन केल्यास टेलिकॉम संसाधन एक वर्षासाठी डिस्कनेक्ट केले जाऊ शकते.

दूरसंचार कंपन्यांनाही दंड

टेलिकॉम ऑपरेटरनाही दंडाला सामोरे जावे लागू शकते. या दंडाची सुरुवातीची रक्कम दोन लाख रुपये असेल, जी पाच लाखांपर्यंत जाऊ शकते. चूक पुन्हा आढळल्यास १० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. दरम्यान, दूरसंचार कंपन्यांची संघटना असलेल्या TRAIने दूरसंचार कंपन्यांवरील दंड वाढवण्याबाबत आक्षेप नोंदवला आहे.

# नाटककार, समीक्षक के. नारायण काळे

मराठीतील एक कवी, नाटककार, समीक्षक, चित्रपट निर्माते आणि नियतकालिकांचे संपादक केशव नारायण काळे यांचा आज स्मृतिदिन. ते बीएएलएलबी होते आणि त्यांचे इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. ग्रीक आणि युरोपियन रंगभूमीचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. नाटकाच्या आवडीमुळेच ते नाटककार झाले. त्यांना के. नारायण काळे म्हणून ओळखले जात असे.



## निमित्त

महाराष्ट्राच्या भूमीने अनेक नररत्न देशाला दिली, ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने योगदान दिले. विविध मान्यवरांनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. त्यापैकीच एक के.नारायण काळे. त्यांचा जन्म २४ एप्रिल १९०४ रोजी झाला.

सुरुवातीच्या काळात काळे यांनी 'भावशर्मा' या नावाने कविता आणि कथा लिहिल्या. १९३२ साली त्यांचा 'सहकारमंजिरी' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्यांनी 'अभिजात' ही चित्रपट कंपनी स्थापन केली आणि 'म्युनिसिपालिटी' या चित्रपटाची निर्मिती केली. प्रभात चित्रसंस्थेवर एक लघुपट काढला होता.

के. नारायण काळे यांनी आठ चित्रपटांत कामे केली होती. नाट्यकलेच्या आकर्षणातून त्यांनी १९३३मध्ये नाट्यमन्वंतर ही नाट्यसंस्था काढली. त्यांनी 'मुद्रा राक्षसम' या संस्कृत नाटकाचे 'कौटिल्य' या नावाचे भाषांतर करून ते त्या संस्थेतर्फे रंगमंचावर आणले. त्यागराज कैलासम यांचे दि पर्पज हे नाटक त्यांनी 'प्रयोजन' या नावाने रंगभूमीवर आणले.

नाट्यमन्वंतर या संस्थेने 'आंधळ्यांची शाळा' हे नाटक रंगमंचावर सादर केले. परंपरेने आलेले संगीत पौराणिक-ऐतिहासिक नाटक नाकारून के. नारायण काळे, अनंत काणेकर, पार्श्वनाथ आळतेकर, ग.य. चिटणीस आदी नाट्यविचारवंतांनी एकत्र येऊन 'आंधळ्यांची शाळा'ची निर्मिती केली. यासाठी के. नारायण काळे यांना त्यांचा परदेशी रंगभूमीचा व्यासंग कामी आला.

१ जुलै १९३३ रोजी झालेल्या या नाटकाच्या पहिल्याच प्रयोगात केशवराव दाते, नाटककार वर्तकांच्या पत्नी सौ. पद्मावती वर्तक, म.रा. रानडे, पार्श्वनाथ आळतेकर, पितळे, ल.भ. केळकर, माधवराव प्रभू, नामजोशी, हर्डीकर आणि के. नारायण काळे यांच्या भूमिका होत्या. नाटकाच्या नायिका अठरा वर्षे वयाच्या ज्योत्स्ना भोळे होत्या. या नाटकाचे त्या काळात शंभराच्या आसपास प्रयोग झाले होते.

के. नारायण काळे हे कलातत्त्वचिंतक, साहित्यसमीक्षक व पुरोगामी विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. रत्नाकर, प्रतिभा, मराठी साहित्य पत्रिका, अशा नियतकालिकांचे त्यांनी संपादनही केले होते.

अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे २० फेब्रुवारी १९७४ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने एक कवी, नाटककार, समीक्षक, चित्रपट निर्माता आणि संपादक काळाच्या पडद्याआड गेला. स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### डोकेदुखी, मायग्रेनचा त्रास टाळण्यासाठी 'हे' करा

डोकं दुखणं ही समस्या बहुतांश जणांना नेहमीच छळत असते. 'आज माझं खूप डोकं दुखतंय', 'डोकं अगदी ठणकतंय' अशी वाक्य आपण आपल्या अवतीभोवती असणाऱ्या व्यक्तींकडून नेहमीच ऐकत असतो. कधी कधी ही वाक्यं आपल्या तोंडातूनही बाहेर येत असतात. डोकं दुखण्याच्या बाबतीत तर महिलांचं प्रमाण पुरुषांच्या तुलनेत खूप जास्त आहे. बऱ्याच जणींचं डोकं नेहमीच दुखत असतं. त्यासाठी त्यांना वारंवार पेनकिलरसुद्धा घ्याव्या लागतात हा त्रास कमी करण्यासाठी आहारतज्ज्ञांनी खूप सोपा आणि उत्तम उपाय सांगितला आहे.



डोकेदुखी होण्यामागची कारणे आणि कमी करण्याचे उपाय

डोकेदुखीत्रा त्रास होण्यामागचं सगळ्यात महत्त्वाचं कारण काय आहे याविषयीची माहिती देणारा व्हिडिओ vocalwavehub या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.

यामध्ये आहारतज्ज्ञ सांगत आहेत की बहुतांश लोकांच्या डोकेदुखीमागे किंवा मायग्रेनच्या त्रासामागे हेच कारण असतं की त्यांच्या मेंदूला योग्य तेवढा ऑक्सिजनचा पुरवठा होत नाही. जर तुम्ही पाणी कमी पित असाल, तुमचं जेवण वेळेवर होत नसेल किंवा तुम्ही श्वास खूप अपूरा किंवा शॉर्ट ब्रिदींग करत असाल तर तुमच्या मेंदूला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि त्यामुळे मग डोकेदुखीचा किंवा मायग्रेनचा त्रास व्हायला सुरुवात होते. त्यांच्यामते ९० टक्के लोकांच्या डोकेदुखीमागे हेच मुख्य कारण आहे.

डोकेदुखी किंवा मायग्रेनचा त्रास कमी करण्यासाठी उपाय

१. डॉक्टर सांगत आहेत की जर तुम्हाला डोकेदुखीचा किंवा मायग्रेनचा त्रास सुरू झाला तर सगळ्यात आधी पाणी प्या. पाण्यातून ऑक्सिजन मिळते आणि डोकेदुखी कमी होण्यास मदत होते.

२. डोकेदुखीचा त्रास कमी करण्यासाठी लगेचच पुरेसा आहार घेणे गरजेचे आहे. त्यामुळे सकस, पौष्टिक घरी तयार केलेले पदार्थ खा.

३. तिसरा उपाय म्हणजे डिप ब्रिदिंग किंवा दिर्घश्वसन. दिर्घ श्वसन काही मिनिटे केल्यानंतर आपोआपच शरीरातील रक्ताभिसरण उत्तम होऊन शरीराला तसेच मेंदूला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन मिळण्यास मदत होते.

# रायगड जिल्हा प्रशासनातर्फे शिवजयंती सोहळा उत्साहात

## जय शिवाजी जय भारत पदयात्रा उत्साहात



**अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'जय शिवाजी, जय भवानी', 'हर हर महादेव' जय शिवाजी जय भारत अशा जयघोषात बुधवारी रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित भव्य जय शिवाजी जय भारत पद यात्रा मोठया उत्साहात संपन्न झाली. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या या जिल्ह्यात या पदयात्रेचे अतिशय दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अलिबाग येथील पोलीस कवायत मैदान येथून जय शिवाजी जय भारतपदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड ज्येष्ठ इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे यांच्या हस्ते पोलीस कवायत मैदान अलिबाग येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमांच्या माध्यमातून पुढच्या पिढीला प्रेरणा देण्याचे काम आपणा सर्वांना करावयाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण आपण पुढे न्यायची आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

ज्येष्ठ इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेस प्रारंभ करण्यात आला. छत्रपतींच्या वेशभूषेतील विद्यार्थी, पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थीनी या पदयात्रेत लक्ष वेधून घेत होत्या. ही पदयात्रा पोलीस कवायत मैदान अलिबाग येथून वरसोली बीच रस्तामार्गे विठ्ठल मंदिर वरसोली कडून मांडवा अलिबाग मार्गावरुन रायगड बाजार मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आली. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजाच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शालेय विद्यार्थांनी विविध मैदानी खेळ, पारंपारिक नृत्य, पोवाड गायन अशा विविध कार्यक्रमांनी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. वद्यार्थ्यांनी केलेला छत्रपती शिवाजी महाराज, मावळे यांचा पेहराव आणि पदयात्रेतील सहभागी विद्यार्थिनींनी केलेला पारंपरिक पोशाख सर्वांचे लक्ष वेधून घेता होता. छत्रपतींच्या जयघोषात निघालेल्या या पदयात्रेने वातावरण शिवमय बनले होते.जिल्हाधिकाऱ्यांनी पदयात्रा यशस्वी केल्याबद्दल सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनी, अधिकाऱ्यांसह सहभागी सर्वांचे आभार व्यक्त केले. पदयात्रेमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग जगदीश सुखदेवे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, तहसिलदार विक्रम पाटील, तहसिलदार (महसूल ) चंद्रसेन पवार यांच्यासह अलिबाग तालुक्यातील सर्व माध्यमिक, प्राथमिक हायस्कूलचे विद्यार्थी-विद्यार्थीनी तसेच एनसीसी, स्काऊट गाईड चे हजारो विद्यार्थी, विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# समाज म्हणून सर्वांनी पत्रकारांच्या पाठीशी उभे रहावे -भागवत

## पत्रकार स्मृती पुरस्काराचे वितरण



**कर्जत : प्रतिनिधी**

आपल्या भागाचा विकास होत नसेल तर या भागांच्या पत्रकारांना समस्या मांडण्यास सांगितले पाहिजे. त्यावेळी समाज म्हणून सर्वांनी पत्रकारांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार मिलिंद भागवत यांनी कर्जत प्रेस असोसिएशन संस्थेचा पहिला वर्धापन दिन सोहळ्यात केले.

कर्जत प्रेस असोसिएशन संस्थेचा पहिला वर्धापन दिन सोहळा पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठ येथील स्वामी सभागृहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार मिलिंद भागवत, माजी आमदार सुरेश लाड, जिल्हा प्रमुख संतोष भोईर, माजी उप सभापती अरविंद पाटील, कर्जत पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड, महावितरणचे उपअभियंता एकनाथ केंद्रे, तालुका गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड, भाजप जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, भाजप तालुका अध्यक्ष राजेश भगत, भाजप महिला तालुका अध्यक्ष नम्रता कांदळगावकर,भाजप तालुका सरचिटणीस वसंत महाडिक,आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी जेष्ठ पत्रकार मिलिंद भागवत यांनी पत्रकारांनी बदलत्या काळात तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज असून कायम अपडेट राहिले पाहिजे .पत्रकारांनी प्रशासन आणि राजकारण राजकीय नेते या दोघांवर थोडंसं लक्ष ठेवलं पाहिजे. पण लेखणीच्या माध्यमातून पत्रकारांनी लोकप्रतिनिधिंचा अपमान किंवा उपमर्द होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे लोकप्रतिनिधिंनी ही आपल्या भागाचा विकास होत नसेल तर या भागातील पत्रकारांना समस्या मांडण्यास सांगितले पाहिजे. त्यावेळी समाज म्हणून सर्वांनी पत्रकारांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. पत्रकार ऐन उमेदीत असताना असताना जेवणाचा डब्बा खायला वेळ नसतो की घरच्यांकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. मात्र हाच पत्रकार समाजातील घडामोडींवर बारीक लक्ष ठेवून असतो. अशा पत्रकारांची काळजी समाज घेणार आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित केला.

कर्जत प्रेस असोसिएशनचे पहिल्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने कर्जत तालुक्यातील दिवंगत पत्रकार यांचे नावे जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांचे वितरण ज्येष्ठ पत्रकार मिलिंद भागवत यांचे हस्ते करण्यात आले.

# रोह्यातील जंगलात भीषण आग,पाच तासानंतर आग विझवण्यात यश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे तालुक्यातील अवचितगड किल्ल्याच्या घेऱ्याला लागुन असलेल्या दरीत रविवार (दि.१६) लागलेला वणवा सह्याद्री रक्षणार्थ वन्यजीव सामाजिक संस्थेने गावातील व संस्थेचे नवीन आणि होतकरू तरुण-तरुणीच्या मदतीने कोणतेही वणवा विझविण्याचे साहित्य उपलब्ध नसताना पाच तास प्रयत्न करुन विझवण्यत यश मिळवले



रविवारी रात्री वणवा लागल्याची कल्पना वनअधिकारी ज्योती मिरगणे यांना मिळताच त्यांनी तात्काळ सह्याद्री रक्षणार्थ वन्यजीव सामाजिक संस्था, रोहा या संस्थेला वणव्याबद्दल माहिती दिली संस्थेचे कार्यकर्ते प्रथमेश कोळी, जागृत पाटील, दत्ता वाघमारे, संकेत हजारे, सूरज भोईर, तेजस बोथरे, जागृती सुर्वे, लिंगम्मा पुजारी, पूर्वा मळेकर, अभिषेक चौलकर, गुरुकेश चावरेकर इत्यादी होतकरू निसर्ग प्रेमी यांनी तत्काळ वणवा लागलेल्या दरी कडे धाव घेतली कोणतेही वणवा विझविण्याचे साहित्य उपलब्ध नसताना संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या हिमतीने हा वणवा विझवला आहे. वणवा विझविण्यासाठी रात्री १०. ३० ला सुरुवात केली ते वणवा पुर्ण विझवायला पहाटेचे ३. ३० वाजले. त्यांना वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे, परिमंडल वनअधिकारी लक्ष्मण हंभीर, ज्योती मिरगणे, मुनिया मुख्या यांनी विशेष सहकार्य केले.

# नरेशदादा पाटील युवा प्रतिष्ठानची ढेकू येथील शिवजयंती उत्साहात

**खोपोली : प्रतिनिधी**

गेली बारा वर्षे अविरत सुरु असलेली खालापूर तालुक्यातील ढेकू येथील नरेशदादा पाटील युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात येणारी शिवाजयंती तालुक्यातील सर्वात मोठी शिवजयंती म्हणून ओळखली जाते.यावर्षीही हि शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करताना, सकाळ पासूनच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.पहाटे काकडा आरती केल्यानंतर सकाळी शिवप्रतिमेचे पूजन खालापूरचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या हस्ते करन्यात आले.परिसरातील नागरिकांनी मंडप फुलून गेला होता.मोठ्या भक्तीभावाने यावेळी शिवप्रतिमेचे पूजन झाल्यानंतर महेशबुवा देशमुख आणि विशालबुवा रसाळ यांच्या भजनाची जुगलबंदी झाली.यावेळी या भजन सम्राटाणी आलेल्या नागरिकांना मंत्रमुग्ध करून टाकले होते.यावेळी नरेशदादा पाटील युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नरेश पाटील,तलाठी अशोक सुसवादे, होणाडचे सरपंच प्रकाश पाटील,साजगावचे सरपंच विनोद खवले,उपसरपंच अजित देशमुख,सुनील सुखदरे,अमोल देशमुख यांसह मोठ्या संखेने परिसरातील नागरिक उपस्थित होते.



शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य सभापती नरेश पाटील छत्रपती शिवरायांचे पूजन करताना .

# कुरुळ येथे क्षयरोग जागरूकता



**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर, थळ यांच्यातर्फे हॉस्पिटल , कुरुळ येथे ११ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत क्षयरोग जागरुकता कार्यक्रम राबविण्यात आला.याचा लाभ १८५ जणांनी घेतला.

भारतातून क्षयरोगाचे निर्मूलन, करण्यासाठी भारत सरकारने ७ डिसेंबर २०२४ पासून १०० दिवसीय टीबी मुक्त भारत अभियान सुरू केले आहे. आर. सी. एफ. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक एस. सी मुडगेरीकर यांच्या निर्देशानुसार व उप महाव्यवस्थापक डॉ निखिल जानी यांच्या नियोजनानुसार आर. सी. एफ. हॉस्पिटल द्वारे हा कार्यक्रम राबविण्यात आला.

आर सी एफ हॉस्पिटल कुरुळ येथे ११ फेब्रुवारी रोजी कंत्राटी कामगारांसाठी क्षयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. १३ व १४ फेब्रुवारी रोजी सी. आय एस. एफ व रेल्वे कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियसाठी आयोजित करण्यात आले. या शिबिराचा लाभ १८५ रुग्णांनी घेतला.

कुरुळ येथे टाऊनशीप कंत्राटी कामगारांसाठी क्षयरोग जागरूकते बाबत आरसीएफ हॉस्पिटलच्या मुख्य प्रबंधक डॉ. प्राची पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी क्षयरोगाबद्दल माहिती दिली.

# रायगड जिल्हा महिला क्रिकेटच्या प्रमुखपदी आदिती दळवी यांची नियुक्ती

**अलिबग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील महिलांच्या क्रिकेट संघटनेच्या प्रमुखपदी आदिती दळवी यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदिप नाईक उपाध्यक्ष राजेश पाटील सदस्य प्रदीप खलाटे, डॉ. राजाराम हुलवान यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे.

ह्यावेळी अलिबाग- मुरुडचे आमदार महेंद्र दळवी उपस्थित होते.रायगड जिल्ह्यात महिलांच्या क्रिकेट स्पर्धा आयोजित करणे,त्यांना योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याची प्रमुख जबाबदारी आदिती दळवी यांच्या कडे असणार आहे,




## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे जाताडे, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र. हे. आर. चौ. मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. सतिश पांडुरंग म्हसकर (म्हस्कर) व इतर | ९२/१ | ०-५१-८०<br>पो. ख. ०-१६-७०<br>एकुण ०-६८-५० | ८.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक / भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **श्री. सतिश पांडुरंग म्हसकर (म्हस्कर) व इतर** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. अतिश सुनिल परदेशी,**
**हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबा. नं. ९७०२८९८९८९**

**पनवेल**
**दि. २०/०२/२०२५**



Rayat Shikshan Sanstha's

## SAU. SHAKUNTALA RAMSHETH THAKUR SCHOOL, ULWE

**Sector-24, Plot No.240,241 Pushpaknode,Ulwe, Tal- Panvel, Navi Mumai - 410 206.**
**Mo. 7710994831 | E-mail : sau.srtcbseulwa@gmail.com**

## Walk In Interview 2025-2026

**Walk In Interview: Date - 09/03/2025, Time - 8:30 am to 4:00 pm,**
**Venue: Sau. Shakuntala Ramsheth Thakur School, Ulwe**

| Sr. No. | Name of the post | Qualification | No. of the post |
|---|---|---|---|
| 1 | **Principal** | Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. 10 years of teaching with 5 years administrative experience in CBSE School | 1 |
| 2 | **Co-Ordinator** | Graduate / Post Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University.<br>5 years experience in CBSE School of which 2 years in Co-ordinator position | 1 |
| 3 | **Pre-Primary (Nursery to Sr.KG)** | H.S.C/B.A/B.Sc./B.Com. and Montessori/E.C.C.Ed./ P.T.C. (From a recognised Institute) | 6 |
| 4 | **PRT Teachers (STD- 1st to 5th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST,P.E., Art, Music, Computer** | Graduate with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. (Preferred CTET qualified teachers)<br>B.A. B.P.Ed./B.Sc. B.P.Ed./ B.Com. B.P.Ed.<br>ATD / G.D. Art/BFA/ AM<br>B.A. / M.A., Sangeet Visharad<br>B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA (with B.Ed. Preferred) From a recognised University. | 17 |
| 5 | **TGT Teachers (STD- 6th to 9th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST, Computer, Special Educator, Counsellor** | Graduate/ Post Graduate in the concerned subject with B.Ed./M.Ed. or equivalent from a recognised University. (Preferred CTET qualified teachers)<br>B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA<br>Graduate with Diploma/ Degree in Special Educator (DSE), RCI Certified (Registered)<br>Graduate/ Post Graduate in Psychology with Certificate of Diploma in Guidance & Counselling, Clinical Psychologist, RCI Certified (Registered) | 9 |
| 6 | **Librarian** | B.Lib. / M.Lib. 2 years of experience in CBSE School | 1 |
| 7 | **Lab Assistant** | B.Sc. In Science with Experience in CBSE School | 1 |
| 8 | **Clerk** | B.Com./ M.Com 2 years of experience in CBSE School A/C using tally. | 2 |
| 9 | **Peon** | HSC,Two years' experience of working in a CBSE school preferred | 2 |
| | | **Total** | **40** |

**Roster will be applicable for Primary, Upper Primary & Secondary Teacher**

| Category | SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | SEBC | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| No. of Post | 5 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 8 | 4 | 4 | 11 | **40** |

**Instructions:**
1) Only candidates with excellent subject knowledge and a professional degree are required to appear for the interview.
2) The application form will be available on the day of interview upon payment of a non-refundable fee of Rs. 100/-.
3) Bring your original documents for verification.
4) Candidates can submit their CV to the email Id- **sau.srtcbseulwa@gmail.com or whats app Mob No-8169392377 on or before 08/03/2025 till 4:00 p.m.**
5) Submit your duly filled application form, along with your CV, attested copies of your documents, and a cover letter, at the office during the interview.
6) Candidates with prior work experience in a CBSE-affiliated school will be given preference.
7) The decision of the selection committee will be final.
8) Please ensure you follow all instructions carefully.

SECRETARY
**RAYAT SHIKSHAN SANSTHA, SATARA**

# नवी मुंबईत शिवजयंती उत्साहात

## ना. गणेश नाईक यांच्याकडून आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वाशी येथील मध्यवर्ती छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पमालिका अर्पण करण्यात आली.



या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, राजेश पवार, संजीव पाटील आणि इतर मान्यवर आणि शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपारिक वेशभूषेत युवक - युवतींची लक्षणीय उपस्थिती होती.

केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती निमित्त 'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रा राबविण्याच्या निर्णयानुसार नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण आणि क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विविध शाळा, महाविद्यालयांनी आपापल्या क्षेत्रात पदयात्रांचे आयोजन केले होते. वाशी विभागातील शाळा, महाविद्यालयांनी आपल्या परिसरापासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत पदयात्रा काढून, शिवरायांचा जयजयकार करीत शिवरायांना अनोखी मानवंदना अर्पण केली.

वाशीतील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थी समुहाने पारंपारिक लेझीम व लाठीकाठी या साहसी खेळाचे प्रदर्शन करीत उपस्थितांची दाद घेतली. इतरही शाळा, महाविद्यालयांनी विविध प्रकारचे पारंपारिक खेळ केले. पारंपारिक वेशभूषेत एकत्र येत नागरिकांनी शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा केला. शिवरायांच्या नामघोषात चौकातील सारा परिसर निनादला होता.

चौकात रंगावलीकार श्रीहरी पवळे यांनी काढलेली छत्रपती शिवरायांची रांगोळी लक्षवेधी होती. अनेकांनी रांगोळी समवेत सेल्फी छायाचित्रे काढली. विशेषत्वाने तरूणाईने चौकातील शिवचरित्रशिल्पकृतींना भेट देऊन शिवरायांचा चरित्रपट जयंतीनिमित्त अनुभवला. शिल्पाकृती वास्तूच्या वरील बाजूस असलेल्या घुमटांवर लावलेल्या शिवरायांच्या विविध भावमुद्रा असणाऱ्या छायाचित्रांमुळे चौकातील वातावरण भारलेले होते.

# फवारणी अभियान राबविण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रभाग ९६ मध्ये नेरूळ सेक्टर १६, १६ ए, १८ परिसरात डास नियत्रंणासाठी फवारणी अभियान राबविण्याची लेखी मागणी माजी नगरसेविका रुपाली भगत यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

नेरूळ पश्चिम परिसरात महापालिकेचा प्रभाग ९६ असून यामध्ये नेरूळ सेक्टर १६,१६ ए आणि १८ या परिसराचा समावेश होत आहे. या परिसरात गेल्या काही दिवसांपासून डासांचा उद्रेक वाढल्याने स्थानिक रहिवाशी त्रस्त झाले आहेत. डासांमुळे सांयकाळनंतर घराची दारे-खिडक्या बंद करुन आतमध्ये बसून राहण्याची वेळ स्थानिक रहिवाशांवर आलेली आहे. सार्वजनिक उद्यानामध्येही डासांमुळे सांयकाळी फिरता येत नाही. मलेरियासारख्या आजारांची स्थानिकांना लागण झाली आहे.

डासांचा उद्रेक नियत्रंणात न आल्यास स्थानिकांना साथीच्या आजाराची लागण होण्याची भीती आहे. डासांच्या त्रासांनी स्थानिक त्रस्त झाले असल्याने प्रभाग ९६ मधील नेरूळ सेक्टर १६, १६ए आणि १८ परिसरात संबंधितांना धुरीकरण अभियान राबविण्याचे निर्देश देण्याची मागणी रुपाली भगत यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# बेलापुरमध्ये मार्जिनल स्पेसमध्ये असलेल्या व्यवसायांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेने मार्जिनल स्पेसमध्ये व्यवसाय करणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईस सुरुवात केली आहे. नवी मुंबई पालिकेने ही कारवाई केली.

दुकानदारांनी अतिरिक्त व्यसयाय व्हावा म्हणून आपल्या दुकानासमोरील मार्जिनल स्पेसचा गैरवापर करून त्याठिकाणी इतर व्यसयाय थाटत असतात. अशाच प्रकारे बेलापुर विभागात अनेक ठिकाणी या वाणिज्यिक संकुलातही दुकानदार मार्जिनल स्पेसचा गैरवापर करून या जागेत व्यवसाय करत होते. याबाबत बेलापुर विभाग अधिकारी अमोल पालवे यांच्याकडे तक्रारी आल्या होत्या.

या तक्रारींच्या अनुषंगाने बेलापुर विभागाच्या वतीने सोमवारी (दि.१७) सायंकाळी या ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत शेकडो व्यवसायिकांवर कारवाई करण्यात आली असून ट्रकभर सामान जप्त करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.



# नवी मुंबईत रस्ता सुरक्षा सप्ताह वॉकथॉन

**नवी मुंबई : बातमीदार**

अपोलो हॉस्पिटल्सने नवी मुंबईतील नेरूळ जिमखान्यामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह जागरूकता वॉकथॉनचे आयोजन केले होते.

रस्त्यावरील अपघातांच्या वाढत्या संख्येचे गांभीर्य ध्यानात घेऊन अपोलो हॉस्पिटल्स असे मानते की, रस्ता सुरक्षा आणि जबाबदारीने ड्रायव्हिंग याविषयी जागरूकता निर्माण करणे खूप गरजेचे आहे. ही चिंता दूर करण्यासाठी त्यांनी रस्ता सुरक्षा सप्ताह जागरूकता वॉकथॉनमार्फत रस्ता सुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्यावर प्रकाश टाकला. या उपक्रमामध्ये नागरिक, डॉक्टर्स आणि पोलीस अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन सामुदायिक बांधिलकीचे प्रभावी प्रदर्शन केले. अपोलो हॉस्पिटल्सने आयोजित केलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताह जागरूकता वॉकथॉनला प्रतिसाद मिळाला.

नागरिकांना रस्ता सुरक्षेविषयी शिक्षित करण्यासाठी, अपघात रोखण्यासाठी, लोकांचे जीव वाचवण्यासाठी जबाबदारीने ड्रायव्हिंगला प्रोत्साहन देण्याच्या आवश्यकतेवर या उपक्रमाने भर दिला. कार्यक्रमाची सुरुवात झुम्बा आणि वॉर्म अपने झाली. त्यानंतर सर्वांनी मिळून १०६६ साठी एक मानवी साखळी तयार केली.

एनएमएमसी, वाहतूक पोलीस आणि अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईच्या अधिकाऱ्यांनी उपस्थितांसमोर मनोगत मांडले आणि त्यांना सुरक्षित ड्रायव्हिंगसाठी प्रोत्साहित केले. आणीबाणीच्या परिस्थितीत काय करावे याबाबतच्या काही सूचना देखील दिल्या.

या कार्यक्रमामध्ये डॉ.बाबासाहेब राजले (विशेष कर्तव्य अधिकारी, मंत्रालय) आणि डॉ.दिनेश बागुल (वरिष्ठ आरटीओ निरीक्षक, आरटीओ मुंबई पूर्व) हे देखील उपस्थित होते. बायकर्स, सायकल चालक, फिटनेस प्रेमी अशा वेगवेगळ्या समूहांच्या नेतृत्वाखाली, रस्ता सुरक्षेला प्रोत्साहन देणारे संदेश लिहिलेले फलक दर्शवत नागरिकांनी वॉकथॉन पूर्ण केले.

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईच्या मेडिकल टीम्सनी वॉकथॉनमध्ये ऍम्ब्युलन्स ब्रिगेडचे नेतृत्व केले. सहभागींना वॉकथॉन पूर्ण केल्याबद्दल पदके देण्यात आली. नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे म्हणाले आज उचललेले प्रत्येक पाऊल जीव वाचवण्याच्या दिशेने उचललेले पुढचे पाऊल ठरणार आहे.

रस्ता सुरक्षा जागरूकता नियमांचे पालन करण्यापुरती मर्यादित नाही, प्रत्येक नागरिकाने जबाबदारीच्या भावनेतून चांगल्या सवयी अंगिकारण्याचा देखील यामध्ये समावेश व्हायला हवा. अपोलो हॉस्पिटल्सचा हा उपक्रम सुरक्षा व सतर्कता यांच्या संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचा हा एक उल्लेखनीय प्रयत्न आहे.

# 'चला सिनेमावर बोलू काही' कार्यक्रम उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक सार्वजनिक ग्रंथालयाच्या वतीने शनिवारी संघाच्या सभागृहात दादासाहेब फाळके यांच्या स्मृती दिनाच्या पूर्वसंध्येला साहित्यिक कट्ट्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. 'चला सिनेमावर बोलू काही' हा या कार्यक्रमाचा विषय होता.

या कार्यक्रमास अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नवी मुंबई शाखेचे उपाध्यक्ष दिनेश जोशी प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. आयस्कॉनचे माजी अध्यक्ष दिगंबर चापके, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर, ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष प्रभाकर गुमास्ते, उपाध्यक्ष रणजीत दीक्षित, निर्मला शिंदे, सचिव सुनील आचरेकर, उत्कर्ष महिला मंडळाच्या अध्यक्षा स्वातीताई फडके, सुभाष हांडे देशमुख, विजय सावंत आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपलक्ष्मी परुळेकर यांनी नेटके केले तर दत्ताराम आंब्रे यांनी उपस्थितांचे यथोचित आभार मानले.




# एफ.जी.नाईक महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

एफ.जी.नाईक महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत १७ आणि १८ फेब्रुवारी २०२५ रोजी आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम मुंबई विद्यापीठ एनएसएस युनिट संलग्नित आगाखान एजन्सी ऑफ हॅबिटॅट यांच्यातर्फे घेण्यात आला होता. या कार्यक्रमावेळी आगा खान एजन्सी ऑफ हॅबिटट या एन.जी.ओ.चे मान्यवर सोनिया सिंघानिया, आकाश गोरे, अमृता पराडकर, अश्विनी पेडणेकर तसेच एफ.जी.नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक, एफ. जी.नाईक महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.दत्तात्रय घोडके, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.कविता पवार व प्रा.प्रमोद साळुंखे, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात अतिथींचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी केले.



प्रास्ताविक पर भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी मुलांना आपत्ती ही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित असू शकते आणि ती आपल्याला कोणत्याही क्षणी, कोणत्याही स्वरूपात भेटू शकते. अशा परिस्थितीत तयारी, बचाव, प्रतिसाद आणि पुनर्वसन या चार टप्प्यांद्वारे आपण आपत्तींच्या परिणामांना कमी करू शकतो. याचे मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीवेळी तातडीची मदत, तसेच आपत्तीनंतर पुनर्वसन याविषयी सखोल मार्गदर्शन करून व्यवस्थापनाचे महत्त्व समजावून सांगितले. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी भूकंप, पूर, त्सुनामी, अग्निकांड, तसेच आरोग्यविषयक आपत्ती यासंदर्भात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली.

सूत्रसंचालन व आभार डॉ. कविता पवार यांनी केले.

# मुळेंखंड कोळीवाडा मच्छीमार संस्थेच्या कार्यालयाचे नुतनीकरण



**उरण : बातमीदार**

मुळेंखंड कोळीवाडा मच्छिमार वि. का. सं. संस्था मर्या. मुळेखंड या संस्थेच्या कार्यालयाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन आमदार महेश बालदी, सहाय्यक आयुक्त संजय पाटील, परवाना अधिकारी सुरेश बाबुलगावे तसेच रायगड जिल्हा झोपडपट्टी व जीर्ण चाळी विकास सेल अध्यक्ष दिपक पाटील उपस्थितीत झाले.

सोसायटीचे चेअरमन विनोद ज. कोळी, व्हॉइस चेअरमन मोरेश्वर गो. कोळी, सचिव किरण दा. कोळी यांना व त्याच्या संपूर्ण सदस्यांना उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# नवीन पनवेलमध्ये बांठीया डेअरी फार्मचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरासह तालुक्यात व नवी मुंबईत प्रसिद्ध असलेल्या बांठीया डेअरी फार्मच्या चौथ्या शाखेचे उद्घाटन नवीन पनवेल येथे मोठ्या उत्साहात करण्यात आले.

सहा महिन्यापूर्वी पनवेल शहर त्यानंतर खारघर, वाशी व आज ग्राहकांच्या सेवेसाठी नवीन पनवेल येथे बांठीया डेअरी फार्मचे उद्घाटन बांठीया कुटुंबियांच्या साक्षीने करण्यात आले. स्वतः ची डेअरी असलेल्या बांठीया फार्मचे स्वतःचे असे ए २ म्हशीचे दुध, दही, मलई पनीर, देशी तुप, लस्सी, मलई मसाला दुध व ग्राहकांसाठी विशेष करून खजुरांची विक्री या दुकानात केली जाणार आहे. तबेल्यातील ताज्या दुधाची फ्रि होम डिलेव्हरी सुद्धा त्यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी ८४२५८८४२५९ येथे संपर्क साधावयाचा आहे.




हे दुकान शॉप नं.६, रिद्धी सिद्धी रेसिडेन्सी, सेक्टर ३, डीएव्ही स्कूलसमोर नवीन पनवेल या ठिकाणी उघडण्यात आले असून या ठिकाणी मिळणार्या विविध प्रकारच्या दुग्धजन्य पदार्थांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अनुज बांठीया, तनुज बांठीया, आकाश व वियांश बांठीया यांनी केले आहे.

# चिरनेर शाळेचे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत जिल्ह्यात चमकले

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा खालापूर तालुक्यातील वडगाव शाळेत आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धेत, लहान गटात उरण तालुक्यातील चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेच्या, देवश्री डोईफोडे, पॅनियल मोकल, सानिध्य फुंडेकर, अश्विनी सिंह, भूमी चव्हाण, अवनी पाटील, किमया नारंगीकर, गौरवी नारंगीकर, स्वरा बरकडे, जिज्ञा पिचड, नील म्हात्रे व तनिष पाटील या इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत, मोबाईलचे अतिक्रमण आणि हरवलेले बालपण या पथनाट्यात भाग घेतला होता. जिल्हा क्रीडा निवड समितीने त्यांच्या पथनाट्याची दखल घेत, त्यांची जिल्ह्यात द्रितीय क्रमांकाची निवड केली आहे.



यानुसार चिरनेर प्राथमिक केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांना द्रितीय क्रमांकाचे सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन, गौरविण्यात आले. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील प्राथमिक शाळांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. चिरनेर शाळेच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या नेत्रदीपक कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, विद्यार्थ्यांबरोबर त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या केंद्रप्रमुख गोपाळ जाधव, माजी केंद्रप्रमुख अविनाश नवाळे, मुख्याध्यापक विश्वनाथ गावंड व शाळेच्या अन्य शिक्षकांचेही अभिनंदन केले जात आहे.

# सिवूड्समध्ये महिला मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमिता निमित्त सिवूड्स सेक्टर ४८, गणेश मैदान येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ८ व ९ मार्च असे दोन दिवस समता महिला मंडळातर्फे आयोजित केलेल्या या मेळाव्यात विविध वस्तूंची रेलचेल असणार आहे.

विविध घरगुती वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येणार असून, त्यामुळे ज्या महिलांना दुकान उभारून वास्तूंची विक्री करता येत नाही अशा महिलाना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तसेच महिलांसाठी मेहंदी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, नृत्य व गायन स्पर्धा, पाककला स्पर्धा, होम मिनिस्टर व पारंपरिक खेळ, संगीतखुर्ची, निबंध, चित्रकला स्पर्धा असणार आहेत.

महिलांची मोफत आरोग्य तपासणीही केली जाणार आहे.



उरण : रसायनी मोहोपाडा विभागातील ग्रुप ग्राम पंचायत वासांबेचे विद्यमान सदस्य व माजी सरपंच राकेश खारकर, सदस्य संतोष कृष्णा पाटील आणि ऋषीकेश खारकर यांनी उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यावेळी उपस्थित विभाग अध्यक्ष सचिन तांडेल, मोहोपाडा शहर अध्यक्ष चेतन जाधव, जयदत्त भोईर, विनोद भोईर, केतन जाधव, किशोर भोईर आदि कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शिव आधार सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने पुस्तक प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून पुस्तक वाचनाचा आनंद घेतला व पुस्तक प्रेमींना तसेच उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



पनवेल : युगप्रवर्तक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मिडल क्लास सोसायटी येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होऊन महाराजांना अभिवादन केले. तसेच उपस्थित सर्वांना शिवजयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

निवडक

## आदिती महोत्सवाला प्रतिसाद



**पेण :** जिल्ह्यात आदिती महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पेण न. प. च्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर नारीशक्तीच्या सन्मानार्थ हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवास राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष उमाताई मुंढे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दयानंद भगत, महिला तालुकाध्यक्ष चैताली पाटील, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, वसुधा पाटील, महिला शहर अध्यक्ष सुचिता चव्हाण, युवती अध्यक्ष मुस्कान झटाम, माजी नगरसेविक प्रतिभा जाधव, मिनाक्षी पाटील, तन्वी हजारे, तनुजा आवास्कर, स्वाती म्हामुणकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमांचे मुख्य आकर्षण म्हणून लग्नाची बेडी फेम अभिनेत्री सायली देवधर यांची उपस्थित लाभली.

## श्री अष्टविनायक पतसंस्थेला पुरस्कार

नागोठणे : सहनिबंधक, सहकारी संस्था नवी मुंबई व कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ मर्यादित अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोकणात सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या पतसंस्थासाठी दिला जाणारा कोकण पतसंस्था भूषण २०२५ द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक नागोठण्यातील श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेस देण्यात आले. हा पुरस्कार महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर, उपाध्यक्ष महादेवसिंग परदेशी, सेक्रेटरी प्रफुल नागोठणेकर, खजिनदार रतन हेंडे, तज्ञ् संचालक प्रकाश जाधव, संचालिका श्वेता चौलकर, वृषाली जोगत, संध्या सांगले, व्यवस्थापिक शैला घासे, शिपाई अशोक गायकवाड, कविता प्रकाश जाधव, सुजित विलास चौलकर यांनी स्वीकारला.



# सूर्य-चंद्र आहेत तोपर्यंत छत्रपती शिवरायांच नाव अजरामर राहील -ना. भरत गोगावले





**कर्जत : प्रतिनिधी**

'छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव चंद्र-सूर्य आहे तोपर्यंत पुसले जाऊ शकत नाही. त्यांनी उभारलेले स्वराज्य आणि त्यांच्या पराक्रमाचा इतिहास अजरामर असल्याचे प्रतिपादन रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी केले.

संपूर्ण हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या भव्य अनावरण सोहळा शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला पाषाणे येथे आयोजित केला. रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, एकनाथ शेलार, दीपक कथोरे, शिवराम बदे, उत्तम शेळके, भरत डोंगरे, प्रशांत झांजे, भरत हाबळे, रामचंद बदे, भानुदास राणे, दशरथ ऐनकर, रवी फोपे, संतोष भुंडेरे, गणेश शेळके आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मंत्री भरत गोगावले यांनी आज आपण सर्व जण छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारकासमोर उभे आहोत, ही मोठी गौरवाची बाब आहे. पाषाण गावाने हे भव्य स्मारक उभारून शिवप्रेमाचा अभूतपूर्व आदर्श निर्माण केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्यासाठी अपूर्व कार्य केले आहे. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन आपण पुढे जावे. कोकणासाठी सर्वाधिक निधी देण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी केले आहे.

त्यामुळे कोकणाच्या विकासाला गती मिळाली आहे. जन्म झाल्यावर जशी पंढरीची वारी करावी, तसे प्रत्येकाने एकदा तरी रायगड पाहायला हवा. रायगड पाहिल्याशिवाय शिवरायांचे कार्य पूर्णपणे समजणार नाही.' असे सांगितले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना आमदार महेंद्र थोरवे यांनी, 'पाषणे गावातील भवानी माता मंदिर, छत्रपती शिव शंभू मंदिर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक ही आपल्या ऐतिहासिक वारसा याची साक्ष देतात. ही ठिकाणे भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरतील आणि याची इतिहासात नोंद घेतली जाईल. शिवचरित्र वाचल्याशिवाय यशाचा मार्ग सापडणार नाही. आजच्या तरुणांनी महाराजांचा आदर्श घेतला पाहिजे आणि त्यांच्या विचारांवर चालत समाजासाठी योगदान दिले पाहिजे.' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## नागोठणे भाजप कार्यालयात शिवजयंती



**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे मोदी पार्क मधील भाजपच्या नूतन मध्यवर्ती कार्यालयात हिंदवी स्वराज्य संस्थापक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अतिशय उत्सहात साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून महाराजांना वंदन करून महाराजांची पुजा अर्चा करण्यात आली. उपस्थित सर्व भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते महाराजांच्या प्रतिमेच्या समोर नतमस्तक झाले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे रोहा, तालुका महामंत्री आनंद लाड, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, रोहा ता क्रीडा संयोजक शेखर गोळे, रोहा ता. शिक्षण सेल उपाध्यक्ष धनराज उमाळे, अल्पसंख्यक सेलचे नेते सिराज भाई पानसरे, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, सोनी पांडे, प्रकाश मिस्त्री आदी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## साई-माणगाव मार्गावर ज्यादा एसटी बसेसची मागणी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव – म्हसळा या मार्गातील छोट्या गावातील, वाड्यातील प्रवाशांना एसटी बसची तासंतास वाट पाहत ताटकळत उभे राहावे लागत आहे. एसटी बसची पुरेशी सुविधा नसल्याने साई ते माणगाव मार्गावरील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. एसटी बससाठी त्यांना तासंतास रस्त्यावर उभे राहावे लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.मोजक्याच बसेस असल्याने प्रवाशांना त्यांच्या निश्चित स्थळी व शाळा, कॉलेजला वेळेवर पोहोचता येत नाही.

# मारुती फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या मारुती फाउंडेशनच्या वतीने रायगड जिल्हा परिषद पेण तर्फे तळे शाळा व माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली.

गेल्या सहा वर्षापासून मारुती फाउंडेशन संस्था समाजातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक चळवळीमध्ये अग्रेसर असणारी अशी संस्था आहे.या संस्थेच्या माध्यमातून शनिवारी रायगड जिल्हा परिषद पेण तर्फे तळे शाळा व शुक्रवारी माध्यमिक विद्यामंदिर रातवड शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दप्तर , कंपास, पेन, पट्टी, खोडरबर, पॅड इत्यादी साहित्यांची मदत देण्यात आली. विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या सुलभ व्हाव्यात अशा प्रकारच्या साहित्यांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या वेळी रायगड जिल्हा परिषद शाळा पेणतर्फे तळे मुख्याध्यापक सचिन कदम, शाळेतील शिक्षकवृंद, तसेच माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील शाळेच्या कार्यक्रमांमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच फाउंडेशनचे अध्यक्ष अजित शेडगे, फाउंडेशनचे सचिव सुमित मोंडे, शालिनी मोडे, धनश्री मोंडे आदी उपस्थित होते.

ऐन परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत प्राप्त झाल्याबद्दल विद्यार्थी व पालकवृंद यांनी समाधान व्यक्त केले आहे. या वेळी फाउंडेशनचे सचिव सुमित मोंडे, धनश्री मोंडे व शालिनी मोंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## मजगाव फुड फेस्टीवलचे उद्घाटन

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मजगाव मराठी शाळेने क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले होते. त्यामध्ये फुड फेस्टीवल मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. या फेस्टिवलचे उद्घाटन मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

या वेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांना उद्देशून त्यांनी मार्गदर्शन करताना गट शिक्षण अधिकारी गवळी म्हणाले की, एकविसाव्या शतकात पुस्तकी ज्ञानापेक्षा जीवनाभिमुख अध्ययन अनुभव देणे ही काळाची गरज असून फुड फेस्टीवलसारख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान व गणितीय संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून कळतात.

यातून स्वावलंबन व रोजगाराभिमूख कौशल्याचा विकास साधणे शक्य होते. आजचा विद्यार्थी सजग व चौकस बुद्धिमत्तेचा विकास करण्यासाठी शासनाकडून असे उपक्रम खूप फायदेशीर ठरत असल्याचे प्रतिपदान गवळी यांनी केले.

या फुड फेस्टीवलमध्ये विद्यार्थ्यांनी तब्बल चौदा स्टॉल मांडले होते. यात गुलाब जामून, पुरणपोळी, मोदक, पराठे, सॅण्डवीच, कुरकुरीत भेळ,ज्युस, चायनीज पदार्थ, कुकीज,अंड्याचे पदार्थ, चिकनचे पदार्थ, वडापाव, भजी , हलवा इत्यादी पदार्थाचा समावेश होता.

या वेळी प्रत्येक स्टॉलचे परीक्षण मुरूड नगरपालिका शाळेच्या शिक्षिका अमृता पोकळ यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत गोयजी स्पर्धाप्रमुख संतोष दहातोंडे तसेच मनिषा वाघरे, चेतन चव्हाण, प्रमिला फुंदे व हर्षा नांदगांवकर यांनी परिश्रम घेतले. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखील मानाजी उपाध्यक्ष उमेश कोंडाजी, योगेंद्र गोयजी यांनी सहकार्य केले.



# अभिजात मराठी भाषा आणि आम्ही

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा केंद्र शासनाने गेल्या ऑक्टोबर २०२४ मध्ये दिला आहे. मराठी माणसाला अभिमान वाटावा अशीच ही घटना आहे. या करीता अनेक वर्ष मागणी करण्यात आली. कोमसाप व इतर संघटनानी ही बाब लावून धरली, त्याला आता यश आले आहे. मराठी भाषेला दोन हजार वर्षापेक्षा अधिक मोठा इतिहास आहे. या भाषेत प्राचीन काळापासून खूप साहित्याची निर्मिती होत आहे ही भाषा स्वंयभू आहे अनेक बोली भाषांनी ती नटलेली आहे अजूनही अनेक बोलींचा अभ्यास होणे बाकी आहे. मराठी भाषा अशा विविधतेनी समृध्द आहे

भाषा ही विचारांच्या देवघेवीचे एक मौखिक आणि लिखित असे साधन आहे भाष् करणे म्हणजे बोलणे अथवा लिहिणे या धातू पासून 'भाषा' हा शब्दाचे अस्तित्व निर्माण झाले कोणतीही भाषा हे विचाराचे देवाण घेवाण करण्याचे साधन असते त्या भाषेचे श्राव्य रूप बोलावयाची भाषा, बोलीभाषा असते भाषा जेव्हा लिपीबध्द होऊन दृश्य रूप घेते तेव्हा ती प्रमाण भाषा किंवा ग्रांथिक लिखित भाषा होते तेव्हा तिचे बोलीपण संपते भाषा ही प्रवाही असते, जी भाषा जिवंत असते ती सतत बोलली जात असते समाजाच्या मोठ्या समूहाकडून तिचा वापर होत असतो जेव्हा तिचा वापर कमी होतो तेव्हा ती मृत होते किंवा संपुष्टात येते भाषेत कालपरत्वे, विभागापरत्वे बदल होत जातो दर बारा कोसावर पाणी आणि भाषा बदलत असते असे म्हणतात ते खरे आहे. सांस्कृतिक आक्रमणेही भाषा बदलास कारणीभूत असतात. वास्तव

भाषा ही एक अशी एक महत्वाची गोष्ट आहे जिच्यामुळे निसर्गापासून इतर प्राण्याहून माणूस प्रगत ठरला आहे. सांस्कृतिक भांडवला मधला भाषा हा महत्वाचा घटक आहे या महत्वाच्या भाषा निमिर्तीची प्रक्रिया गेली पाच लाख वर्ष सातत्याने सुरू आहे भाषातज्ञांच्या अंदाजानुसार अस्तित्वात असलेल्या सहाहजार भाषांपैकी २२व्या शतकाच्या पर्यत यातील यातील दोन हजार भाषा टिकणारही नाहीत समाजाच्या गरजा बदलत असतात मग त्यानुसार भाषाही बदलत जाते. दहा हजार वर्षापूर्वी शेतीचा शोध लागल्या नंतर मानवी जीवनाला स्थैर्य मिळू लागले आणि भाषेची गरज व्यक्त होण्यासाठी भासू लागली आणि वेगवेगळ्या भाषा अस्तित्वात आल्या लिपीचा शोध लागून लेखन कला उदयास आली.

आमची मराठी भाषा अभिजात नाही का?' असा प्रश्न अनेकदा पडत होता मराठी साहित्य संमेलनात एक तंबू उभारून पत्रे लिहून वारंवार केंद्रशासनाला विनंती केली जात होती आता ही मागणी पूर्ण झाली आहे. १२ कोटी मराठी माणसाना आनंद झाला आहे या वर्षी राजधानी दिल्लीत ९८ वे भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. हा ही अमृतयोग आहे मराठी माणसांचा हा कुंभमेळा आता दिल्लीत भरणार आहे.

९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

मराठी भाषा किती तरी प्राचीन आहे. संस्कृत जेव्हा ज्ञानभाषा होती तेव्हा प्राकृत ही जन सामान्यांची बोली भाषा होती. या प्राकृत भाषेतून पुढे अनेक भारतीय भाषांची निर्मिती झाली अडीच हजार वर्षापूर्वी महाराष्टासह कर्नाटक आंध्र प्रदेशावर सातवहानांची सत्ता होती महाराष्ट्राचा समावेश या पंच द्राविडामध्ये केला जातो मराठी प्राकृत भाषेचे संदर्भतेव्हापासून उपलब्ध आहेत. सातवाहन राजा हाल यांने (इ.स. २०-२४) या काळात 'गाथा सप्तशती ग्रंथ लिहिला गेला त्यातील वर्णन शृंगारीक असले तरी सामाजिक स्थिती दर्शक आहे.

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले आहे. इंग्रजी ही जागतिक संवादाची भाषा झाली आता इंग्लीश शिकणे भाग पडले आहे नोकरी धंदयासाठी ते सक्तीचे वाटू लागले गोरे गेले पण मानसिक पराधिनता संपली नाही अगदी खेडोपाडी, झोपडपटटीतही इंग्लीश माध्यमाच्या शाळांत मुलांनी शिकणे आवश्यक वाटू लागले आहे अशा शाळांचे पेव फुटले आहे समाजाची मानसिकता बदलली आहे. आज सरकारी व मराठी माध्यमांच्या शाळा रित्या झाल्या आहेत जिल्हा परीषदेच्या शाळांमध्ये हिंदी भाषिकांची मुले शिकत आहेत खासगी शाळांमध्ये भरमसाट फी आकरली जाते तीही कळ सोसून गरीब पालक भरतात. पटसंख्या कमी होत असल्याने सरकारी शाळा ओस पडत आहेत मराठी माध्यमा बाबत वेगळा पगडा समाजावर पडला आहे केवळ इंग्लीश माध्यामाच्या शाळांत आपली मुले शिकली तरच ते पुढील तांत्रिक शिक्षण घेऊ शकतील नोकऱ्या मिळवतील, असा एक मोठा भयानक विचार समजात रूढ झाला आहे. मराठीच्या अधोगतीचे ते एक मोठे कारण आहे.

चीन, जपान, रशिया, जर्मनी सारख्या देशात अभ्यासक्रम एकाच स्थानिक भाषेत शिकवला जातो. इंग्रजी केवळ एक जागतिक व्यवहाराची भाषा विषय समजला जातो. मुलांना आपल्या मातृभाषेतच सर्व शिक्षण दिले जाते इंजिनीयरींग, मेडीकल किंवा इतर तांत्रिक शिक्षणही स्थानिक भाषेत दिले जाते महाराष्टातही कायद्याची, विज्ञानाची भाषा आता मराठी होत आहे. भारतात एक मोठा बिकट भाषिक वाद आहे अनेक प्रांताची भाषा वेगवेगळी आहे तामीळ, बंगाली कानडी, मळयालम, आसामी अशा अनेक भाषा प्रांतवार भाषा रचनेमुळे आल्या दक्षिणेत हिंदी बोलली जात नाही पण इंग्रजीत बोलले जाते, परकीय असली तरी इंग्रजी आपल्याला जोडणारी भाषा ठरते आहे हे नाकारता येत नाही. हा प्रादेशिक अस्मितावाद आहे, महाराष्ट कर्नाटक सीमावादही एक भाषावादच आहे.

महाराष्टात येणाऱ्या परप्रांतियानी आपल्या व्यवहारात मराठीचा वापर अधिक करावा दुकानांच्या आस्थापनेच्या पाटयावर ठळकपणे मराठीत लिहिले जावे, अशा लोकांशी मुद्दाम मराठीतच बोलावे त्यामुळे त्यांना मराठीत व्यवहार करणे गरजेचे वाटेल आपला दबाव त्याच्यांवर आपोआप पडेल. मुंबई आपली असली तरी बॉलीवुडमध्ये हिंदीभाषिक चित्रपटाची दादागिरी मुंबईत चालते. मराठी चित्रपटाना थिएटर उपलब्ध होत नाहीत किंवा सोईच्या वेळा दिल्या जात नाहीत. त्यामुळे तराठी चित्रपटाना प्रेक्षक उपलब्ध होणाऱ्या वेळा देणे बंधनकारक असावे, मराठी चित्रपट करमुक्त असावेत व चांगल्या चित्रपट निर्मिती करीता अनुदान दिले जावे मराठी नाटकानाही कर सवलत असावी कमी भाडयात नाट्यगृह उपलब्ध केली जावीत जेणे करून मराठी सांस्कृतिक क्षेत्रास उत्तेजन मिळेल. अनेक कलाकाराना रोजगार मिळेल व इतर भाषांच्या स्पर्धेत ते टिकून रहातील. अनेक चांगल्या कलाकृती निर्माण होतील कथाकार गीतकार यांना व्यासपीठ उपलब्ध होईल.

वाचन संस्कृती वाढावी या करीता ग्रंथालयाना शासकिय अनुदान भरघोस मिळावे वाचनालयातील कर्मचारी हा ही शासकिय कर्मचारी म्हणून मान्यता मिळावी त्या कर्मच्याऱ्याना अत्यंत कमी वेतानात १२ तास राबविले जाते. वाचनालयात अनेक पुस्तके उपलब्ध होतात तो प्रकाशन व्यवसाय हा उद्योग मानून त्यास कर्ज, व सवलती मिळाल्या तर मराठी लेखकाना कवीना आपले लेखन प्रसिध्द करण्यास अधिक वाव मिळेल. त्यात दर्जेदार साहित्यास पुरस्कार मिळावेत.

आपल्या शेजारी असलेल्या भूतान या लहानशा देशात भारताच्या मदतीने शैक्षणिक विकास झाला आहे परंतू तेथिल सरकारी शाळा भारतापेक्षा अधिक यशस्वी झाल्या आहेत कारण तेथिल राजा किंवा उच्च अधिकारी, श्रीमंत लोक यांची मुले सरकारी सरकारी शाळेतच शिकतात मग आपोआप इतरांची मुलेही सरकारी जि.प. किंवा नगरपालिका शाळेत जातात त्यांचा शिक्षणाचा दर्जाही खाजगी शाळापेक्षा चांगला असतो या पासून बोध घेता येतो की लोकांमध्ये अगदी खेडोपाडी इंग्रजी माध्यमाचे जे फॅड पसरले आहे ते कमी झाले पाहिजे.

शिवाजी जन्माला यावा पण तो आपल्या घरात नसून शेजाऱ्याच्या घरात यावा आम्ही फक्त तुम लढो -- असे म्हणायचे असे न करता आपल्या घरापासूनच सुरूवात करावी मुलांशी शेजाऱ्यांशी बाजारात मराठीतच बोलावे जर महाराष्टात नोकरी धंदा करायचा तर परप्रांतीयांना कळले पाहिजे इथे मराठीच बोलले पाहिजे. माझे असेही निरिक्षण आहे की परभाषिक हिंदी किंवा अन्य त्यांची दुसरी पिढी जी मुंबईत किंवा महाराष्टात जन्माला आली आहे. ही मुले मराठी उत्तम बोलतात समजतात मुंबई, नवी मुंबईच्या ठाणे, बेलापूर, कल्याण, उरण, पनवेल परिसरात इतर नगरपालिका किंवा जिल्हा परिषदांच्या शाळात नजर टाकली तर असेही चित्र दिसते.

समाजाचे रहाणीमान बदलले आहे विचारसरणी बदलली आहे ती बदलणे गरजेचे आहे पण मातृभाषेचा अभिमानही असणे आवश्यक आहे शेवटी समाज महणजे काय तर समाजातील माणसे आहेत अनेकजण एकाच विचाराने प्रेरीत झाले तरच हा कारवा नव्हे ही दिंडी पुढे जाईल. अशी अस्मिता जागृत होणे मराठीच्या भविष्याकरीता संवर्धना करीता महत्वाचे आहे.

**-डॉ. पाटील अविनाश विठ्ठल**
**संशोधन अधिकारी,**
**जलसंपदा विभाग, मंत्रालय (निवृत्त)**
**एम.ए., एम.फिल, पीएच.डी, डि सी ए. (जर्नालिझम)**


























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com